रायगड, नवी मुंबई

# राम प्रहर

◆ वर्ष १६ ◆ अंक २७७
www.ramprahar.com

गुरुवार, २५ एप्रिल २०२४ ◆ पाने ८ ◆ किंमत ₹ २




## प्रवीण राऊतांची ७३.६२ कोटींची मालमत्ता जप्त



**मुंबई :** ठाकरे पक्षाचे नेते तथा खासदार संजय राऊत यांचे निकटवर्तीय प्रवीण राऊत यांची ७३ कोटी ६२ लाख रुपयांची मालमत्ता ईडीने बुधवारी (दि. २४) जप्त केली. गोरेगाव येथील पत्राचाळ पुनर्विकासात झालेल्या घोटाळ्याप्रकरणी ईडीने राऊतांवर ही कारवाई केली. जप्त केलेल्या मालमत्तेमध्ये प्रवीण राऊत व त्यांच्या निकटवर्तीयांच्या पालघर, दापोली, रायगड आणि ठाणे जिल्ह्यात असलेल्या काही भूखंडांचा समावेश आहे. यावरून भाजप नेते किरीट सोमय्या यांनी हिसाब तो देना पडेगा, अशा शब्दांत खोचक टोला लगावला. दरम्यान, पत्राचाळ भूखंड आणि त्यावरील एफएसआयच्या विक्रीतून मिळालेल्या पैशांपैकी ९५ कोटी रुपये हे प्रवीण राऊत यांना मिळाले असून त्यांनी हे पैसे त्यांचे कुटुंबीय, मित्र आणि काही व्यावसायिकांच्या खात्यामधे फिरवल्याचा ठपका ईडीने ठेवला आहे.

# विदर्भातील आत्महत्याग्रस्त शेतकरी कुटुंबांची माफी मागा!

- अमित शाहांनी विरोधकांवर केला हल्लाबोल
- अमरावती येथे जाहीर विजय संकल्प सभा



**अमरावती : प्रतिनिधी**

अमरावतीच्या भाजप-महायुतीच्या उमेदवार नवनीत राणा यांना पाठिंबा दिल्याबद्दल अमरावतीकरांची माफी मागण्याऐवजी, केंद्रात कृषीमंत्री असूनही शेतकऱ्यांसाठी, विदर्भातील सिंचन प्रकल्पांसाठी काहीच न केल्यामुळे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या कुटुंबांची, आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या विधवांची माफी मागून प्रायश्चित्त घ्या, असे आव्हान केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी बुधवारी (दि. २४) अमरावती येथील जाहीर विजय संकल्प सभेत ज्येष्ठ नेते शरद पवार यांना दिले.

अमरावती लोकसभा मतदारसंघाच्या भाजप-महायुतीच्या उमेदवार नवनीत राणा यांच्या प्रचारार्थ भर पावसात झालेल्या सभेत अमित शाह यांनी शरद पवार, उबाठा गटाचे नेते उद्धव ठाकरे, काँग्रेसचे राहुल गांधी यांच्यावर जोरदार टीका केली. काँग्रेस, इंडीया आघाडीचाही त्यांनी खरपूस समाचार घेतला. शरद पवार हे महाराष्ट्रात मुख्यमंत्री होते, केंद्रात कृषीमंत्री होते, पण विदर्भातील शेतकऱ्यांसाठी त्यांनी काहीच केले नाही, त्यामुळेच विदर्भातील हजारो शेतकऱ्यांवर आत्महत्या करण्याची वेळ ओढावली.

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उमेदवार नवनीत राणा, खासदार डॉ. अनिल बोंडे, आमदार प्रवीण पोटे, आमदार प्रकाश भारसाकळे, आमदार रवी राणा, भाजप प्रदेश सहमुख्य प्रवक्ते विश्वास पाठक आदी या वेळी व्यासपीठावर उपस्थित होते. जोपर्यंत देशात भारतीय जनता पक्ष आहे, तोवर एससी, एसटी व ओबीसींचे आरक्षण कोणीही रद्द करू शकणार नाही, ही मोदींची गॅरंटी आहे, अशी ग्वाही ना. शाह यांनी दिली.

महाराष्ट्राला नक्षलवादापासून मुक्त करण्याचे काम पंतप्रधान मोदीजींनी केले. काँग्रेस सत्तेवर आली तर तिहेरी तलाक पुन्हा सुरू करण्याची काँग्रेसची भूमिका आहे, पण काँग्रेसला पुन्हा सत्ता द्यायची नाही असा निश्चय जनतेनेच केला आहे, असे सांगून शाह यांनी मोदी सरकारच्या दहा वर्षांच्या कारकिर्दीतील जनहिताच्या कामांचा संपूर्ण तपशील सभेसमोर ठेवला.





**पनवेल : भाजप, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, मनसे, आरपीआय, पीआरपी, रासप व मित्रपक्षाचे मावळ लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारार्थ उरण विधानसभा मतदारसंघाची जाहीर सभा आणि आपटा ग्रामपंचायत सदस्यांचा पक्षप्रवेश सोहळा बुधवारी आपटा येथील पाटील मैदानावर झाला. या वेळी भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर, आमदार महेश बालदी यांच्या प्रमुख उपस्थितीत आपटा ग्रामपंचायत सरपंच मयूर परशुराम शेलार यांच्यासह शेकडो कार्यकर्त्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. मान्यवरांकडून सर्वांचे पक्षात स्वागत करण्यात आले. या वेळी उरण तालुकाध्यक्ष रवी भोईर, माजी जि. प. सदस्य ज्ञानेश्वर घरत आदी पदाधिकारी, कार्यकर्ते व प्रवेशकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. (वृत्त उद्याच्या अंकात)**

## 'कर्नाळा'च्या खातेदारांना बँक ऑफ बडोदाने विम्याची रक्कम दिलीच नाही

### २३७ खातेदार अद्याप प्रतीक्षेत

**पनवेल : प्रतिनिधी**

बँक ऑफ बडोदाने बुडीत निघालेल्या कर्नाळा बँकेच्या २३७ खातेदारांना त्यांच्या विम्याची रक्कम अद्याप परत दिली नसल्याची धक्कादायक माहिती हाती आली आहे. हे खातेदार अजूनही ही विम्याची रक्कम मिळेल या प्रतीक्षेत आहेत.



केंद्र सरकारच्या अर्थ खात्याने बँकेतील ठेवींवरील विम्याबाबत घेतलेल्या निर्णयामुळे कर्नाळा नागरी बँकेच्या ठेवीदारांना एक लाखांऐवजी थेट पाच लाख रूपयांची विमा भरपाई मिळाली. या पार्श्वभूमीवर बँकेकडे पाच लाखांपर्यंत ठेव असलेल्या ३८ हजार ठेवीदारांसाठी मंजूर करण्यात आलेल्या ३७६ कोटी रुपयांपैकी ३६८ कोटी रुपयांचे वाटप आतापर्यंत पूर्ण झाले आहे, मात्र बँक ऑफ बडोदाने कर्नाळा बँकेच्या २३७ खातेदारांना त्यांच्या विम्याची रक्कम अजूनही परत दिलेली नाही. कर्नाळा नागरी सहकारी बँकेत ५४३ कोटींचा आर्थिक घोटाळा झाला. या पार्श्वभूमीवर रिझर्व्ह बँकेने कर्नाळा बँकेचा व्यवसाय परवाना रद्द केला. या प्रकरणी कर्नाळा बँकेचे अध्यक्ष विवेकानंद पाटील यांना 'ईडी'ने अटक केली. त्यांच्या जामीनावर उच्च न्यायालयात ८ मे २०२४ रोजी सुनावणी होणार आहे.

केंद्र सरकारच्या यापूर्वीच्या नियमानुसार बंद झालेल्या बँकेच्या खातेदारांना विमा संरक्षणाच्या माध्यमातून केवळ एक लाख रुपयेच परत मिळत होते. हे पैसे परत मिळण्यासाठी कालावधीही निश्चित नव्हता. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने जनहितासाठी नवीन कायदा मंजूर केला. त्यानुसार खातेदारांना एक लाखाऐवजी पाच लाख रुपये बँक बंद झाल्यापासून ९० दिवसांच्या आत परत मिळणार आहेत. त्याचा लाभ कर्नाळा बँकेतील खातेदारांनाही झाला.

व्यवसाय परवाना रद्द झालेल्या कर्नाळा बँकेतील खातेदारांना डिपॉझिट इन्शुरन्स अ‍ॅण्ड क्रेडीट गॅरन्टी कॉर्पोरेशन (डीआयसीजीसी) या केंद्र सरकारने केलेल्या या नवीन कायद्यामुळे पाच लाखापर्यंतच्या ठेवी परत मिळाल्या. नव्या नियमानुसार पाच लाखांपेक्षा कमी रक्कम असलेल्या ४९,४२३ ठेवीदारांचे एकूण २४० कोटी रुपये देणे होते. ही रक्कम मोदी सरकारच्या निर्णयानुसार विमा संरक्षणाच्या माध्यमातून खातेदारांना परत मिळाली आहे.

कर्नाळा बँक बुडीत निघाल्याने पाच लाखापर्यंत ठेवी असलेल्या खातेदारांना देण्यात येणारी विमा रक्कम आत्तापर्यंत ५२ हजार ठेवीदारांना परत करण्याची प्रक्रिया पूर्ण झाली आहे, मात्र बँक ऑफ बडोदाने अद्यापही २३७ खातेदारांची रक्कम त्यांच्या खात्यात वर्ग केलेली नाही. कर्नाळा बँक प्रशासन रक्कम खातेदारांच्या खात्यात वर्ग करण्यासाठी बँक ऑफ बडोदाकडे पाठपुरावा करीत आहे. काही तांत्रिक कारणांमुळे २३७ ठेविदारांची ६३ लाख रुपयांची रक्कम बँक ऑफ बडोदामध्ये अडकली आहे.

कर्नाळा बँकेचे अवसायक बाळकृष्ण कडकदौंड यांनी २३७ ठेवीदारांचे ६३ लाख रुपये त्यांना मिळावेत यासाठी लेखी पत्रव्यवहार बँक ऑफ बडोदाकडे केला आहे, पण त्याला प्रतिसाद न मिळाल्याने या खातेदारांच्या पैशांबाबत अजूनही निश्चित निर्णय झालेला नाही.

## निवडक

### ना. गडकरींना भोवळ; जरांगेंचीही प्रकृती बिघडली

**यवतमाळ, बीड :** महाराष्ट्रात सध्या उन्हाचा कडाका प्रचंड वाढला आहे. या उन्हाच्या कडाक्यामुळे अनेकांना उष्माघाताचा त्रास होतोय. यवतमाळमध्ये बुधवारी एका सभेदरम्यान केंद्रीय मंत्री नितीन गडकरी यांना भोवळ आली. यानंतर मराठा नेते मनोज जरांगे-पाटील यांचीही बीडच्या दौऱ्यादरम्यान त्यांची प्रकृती बिघडल्याची माहिती मिळाली. त्यांच्यावर रुग्णालयात उपचार सुरु आहेत.

### येडेश्वरी देवी यात्रेला भाविकांचा जनसागर

**येरमाळा :** येथील श्री येडेश्वरी देवीच्या यात्रेचा चुना वेचण्याचा मुख्य कार्यक्रम बुधवारी (दि. २४) मोठ्या उत्साहात झाला. या कार्यक्रमासाठी पंधरा लाखांच्या वर भाविक येरमाळा नगरीत दाखल झाले होते. चुन्याच्या रानात पालखीचे आगमन होताच लाखो भाविकांच्या या गजराने चुन्याच्या रानाचा परिसर दुमदुमून गेला होता. श्री येडेश्वरी देवीच्या यात्रेला राज्यातील दुसऱ्या क्रमांकाची मोठी यात्रा असा मान प्रशासन स्तरावर आल्याने यात्रा पार पाडण्याची जबाबदारी जिल्हा प्रशासनावर आली आहे.

## खासदार श्रीरंग बारणे यांच्या विजयासाठी आज पनवेलमध्ये प्रचार दौरा आणि सभा



**पनवेल : रामप्रहर वृत्त**

भारतीय जनता पक्ष, शिवसेना, राष्ट्रवादी काँग्रेस, मनसे, आरपीआय, पीआरपी, रासप व मित्रपक्षाचे मावळ लोकसभा मतदार संघाचे अधिकृत उमेदवार श्रीरंग बारणे यांच्या प्रचारार्थ गुरुवारी (दि. २५) पनवेलमध्ये प्रचार दौरा आणि सभा होणार आहेत.

या वेळी उमेदवार खासदार श्रीरंग बारणे, माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी, पनवेल तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत, शहर अध्यक्ष अनिल भगत, विधानसभा प्रमुख नितीन पाटील, माजी सभागृह नेते परेश ठाकूर, शिवसेनेचे जिल्हाप्रमुख रामदास शेवाळे, उपजिल्हाप्रमुख महानगरप्रमुख प्रथमेश सोमण, राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस भिमसेन माळी, प्रदेश चिटणीस शिवदास कांबळे, जिल्हाध्यक्ष महादेव पाटील, शिवसेनेचे तालुका प्रमुख रूपेश ठोंबरे, आरपीआयचे जिल्हाध्यक्ष नरेंद्र गायकवाड, रासपचे अण्णा वावरे यांच्यासह महायुतीतील इतर पदाधिकारी, मान्यवर, स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत.

सकाळी ९ वाजता शेडुंग येथील हनुमान मंदिर येथून प्रचार दौऱ्याला सुरुवात होणार आहे. पुढे बेलवली, लोणीवाली, वांगणी, आंबिवली, नेरे असा प्रचार दौरा होणार असून वाजे येथे सभा होणार आहे. त्यानंतर शिवणसई, दूंदरे, रिटघर, खानाव, मोर्बे, महालुंगी, चिंध्रण, पालखुर्द, वावंजे येथे प्रचार दौरा त्यानंतर खैरणे येथे सभा, पुढे नितळस, तोंडरे, पेंधर येथे प्रचार दौरा आणि नंतर नावडे व फेज २ तसेच पनवेल कोळीवाडा येथे सभा होणार आहे.

## रिक्षा अपघातात महिलेचा मृत्यू; तीन जण जखमी

**मोहोपाडा :** आपटा गावातील मारुती गणपती मंदिरासमोर रिक्षा व पिकअपच्या अपघातात एका महिलेचा मृत्यू तर तिघे जखमी झाल्याची घटना घडली.

रिक्षाचालक अनंता राम भोईर (वय ५७, रा.आपटा) हे लाडीवली ते आपटा रिक्षा जात असताना आपटा गावात समोरून वेगाने पिकअप टेम्पो (एमएच एआर ५७९६) आल्याने त्यांच्या ताब्यातील रिक्षा पिकअप टेम्पोला धडकून उलटली. या ते स्वतः चे व पुष्पा संतोष पवार (वय ३८, रा.लाडीवली), राजेश राम वाघे (वय २२, रा. आपटा) हे तिघे जखमी झाले असून यात मानसी मोहन वाघे, (वय ३४, रा.लाडीवली) यांच्या डोक्याला व तोंडाला गंभीर दुखापत होऊन त्यांचा मृत्यू झाला. तसेच रिक्षा व पिकअप टेम्पो याचे नुकसान झाले आहे. याबाबत रसायनी पोलिसांत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. अधिक तपास सुरू आहे.

## सत्ता गेल्यामुळे ते सैरभैर झालेत

### मुख्यमंत्री शिंदेंचा उद्धव ठाकरेंना टोला

**हिंगोली : प्रतिनिधी**

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची हिंगोलीतील वसमतमध्ये जाहीर सभा झाली. या वेळी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी उद्धव ठाकरेंवर जोरदार हल्लाबोल केला. त्यांची सत्ता गेल्यामुळे ते सैरभैर झाले आहेत. बाप एक नंबरी बेटा दस नंबरी असे काम त्यांचे झाले आहे, असा टोला मुख्यमंत्री शिंदे यांनी उद्धव ठाकरे आणि आदित्य ठाकरे यांना लगावला.



फेसबुक लाईव्ह करून सरकार चालवता येत नाही. आम्ही राजकारणात जेवढे वर्ष काम केले तेवढे त्यांचे वयदेखील नाही, असेही मुख्यमंत्री शिंदे या वेळी म्हणाले.

देशात गेल्या ५० वर्षांपासून गरीबी हटावचा नारा देणाऱ्या पक्षाने नारा दिला. पण गरीबी हटली नाही. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने २५ कोटी जनतेला गरीबीतून वर आणले आहे. गेल्या ५० ते ६० वर्षात जे काम झाले नाही ते गेल्या १० वर्षात झाले आहे. आज १० वर्षांत केलेला कारभार आणि ५० वर्षात त्यांनी (काँग्रेसने) केलेला कारभार पाहा. जर याची तुलना केली तर १० वर्षांची उंची ही एका हिमालयाएवढी वर जाईल आणि ५० वर्षांची एवढी छोटी टेकडी दिसेल, असा हल्लाबोल मुख्यमंत्री शिंदे यांनी विरोधकांवर केला.

ते पुढे म्हणाले, आता विरोधक काहीही आरोप करायला लागले आहेत. एका शेतकऱ्यांच्या मुलाला ते बोलले आहेत, मात्र मी एवढेच ठरवले आहे की, तुम्ही आरोप करा. मी कामातून तुमच्या आरोपाला उत्तर देईल. देवेंद्र फडणवीस आणि आम्ही बरोबर काम करत होतो. त्यानंतर अजित पवार बरोबर आले आणि सरकार मजबूत झाले. ते म्हणत होते आज सरकार पडणार, उद्या सरकार पडणार पण सरकार पडले नाही आणि त्यांचा ज्योतिषी खोटा निघाला, असा पलटवार मुख्यमंत्री शिंदे यांनी ठाकरेंवर केला.

आम्ही दोन वर्षांपूर्वी उठाव केला आणि लोकांना न्याय देणारे सरकार स्थापन केले. घरात बसून सरकार चालवता येत नाही. अजित पवार सकाळी ६ वाजता उठतात. मी पहाटेपर्यंत काम करतो. पहाटे अजित पवार काम सुरू करतात आणि देवेंद्र फडणवीस दिवसभर काम करतात, म्हणजे २४ तास आपले सरकार चालते आहे. घरी बसून राज्य चालवता येत नाही. फेसबुक लाईव्ह वरून राज्य चालवता येत नाही, असा हल्लाबोल मुख्यमंत्री शिंदे यांनी केला.

## विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच कौशल्य गुण विकसित करावे -लोकनेते रामशेठ ठाकूर

- महात्मा फुले महाविद्यालयात पदवीदान समारंभ



(छाया : अक्षय शार्दुल)

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

आजच्या स्पर्धेच्या काळात केवळ शिक्षण असून चालत नाही तर विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबत कौशल्यगुण विकसित करणे आवश्यक असल्याचे मत रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी येथील महात्मा फुले महाविद्यालयातील पदवीदान समारंभात केले. माणूस पैशाने मोठा ठरत नसून मनाने मोठा असावा लागतो. स्वच्छ विचार आणि अपार मेहनत करण्याची तयारी आपल्याला मानसन्मान मिळवून देते, असेही त्यांनी या वेळी नमूद केले.

रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा फुले कला विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयात बुधवारी पदवीदान समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. हा समारंभास महाविद्यालयाच्या स्थनिक व्यवस्थापन समितीचे चेअरमन लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या अध्यक्षतेखाली आणि सांगली येथील रावसाहेब रामराव पाटील महाविद्यालयाचे प्राचार्य तथा रयत शिक्षण संस्थेचे माजी सहसचिव डॉ. के. एच. शिंदे यांच्या प्रमुख उपस्थितीत झाला.

या वेळी प्राचार्य डॉ. के. एच. शिंदे यांनी, काळ बदलत आहे, स्पर्धा वाढते आहे. आपण काळाची पाऊले ओळखून योग्य दिशेने पाऊल टाकणे आवश्यक आहे, असा सल्ला विद्यार्थ्यांना दिला. (पान २ वर..)

## जून ते सप्टेंबरदरम्यान समुद्राला मोठे उधाण

### यंदाच्या पावसाळ्यात २२ दिवस धोकादायक

**अलिबाग : प्रतिनिधी**

यंदा पावसाळ्यात जून ते सप्टेंबर या कालावधीत २२ दिवस समुद्राला मोठे उधाण येणार आहे. या दिवसांमध्ये समुद्रात ४.५० मीटरपेक्षा जास्त उंचीच्या लाटा येणार आहेत. २० सप्टेंबर रोजी यंदाची सर्वांत मोठी भरती येणार आहे. या दिवशी समुद्रात ४.८४ मीटर उंचीच्या लाटा उसळणार आहेत. भरतीच्या वेळी जोरदार पाऊस पडल्यास समुद्र व खादिकीनारी असलेल्या १४५ गावांमध्ये उधाणाचे पाणी शिरू शकते. त्यामुळे हे दिवस धोकादायक आहेत.

यंदाच्या पावसाळ्यात ५ जून ते २२ सप्टेंबर या कालावधीत २२ दिवस समुद्राला मोठी भरती येणार आहे. जून महिन्यात सात दिवस, जूलैमध्ये चार दिवस, ऑगस्टमध्ये पाच दिवस तर सप्टेंबरमध्ये सहा दिवस ४.५० मीटरपेक्षा जास्त उंचीच्या लाटा आसलेली भरती येणार आहे. त्यापैकी २० सप्टेंबर रोजी सर्वांत मोठी भरती असेल. या दिवशी ४.८४ मीटर उंचीच्या लाटा उसळणार आहेत. २१ सप्टेंबर रोजी ४.८२ मीटर, २१ ऑगस्ट रोजी ४.८१ मीटर व २२ ऑगस्ट रोजी ४.८० मीटर उंचीच्या लाटा उसळणार आहेत.



२२ दिवस समुद्राला मोठी भरती येणार असल्यामुळे रायगड जिल्हा प्रशासनाने रायगड जिल्ह्यात समुद्रकिनारी व खाडीकिनारी असलेल्या गावांना सतर्कतेचा इशार दिला आहे. रायगड जिल्ह्यात २११४ गावे आहेत त्यापैकी ४६ गावे समुद्रकिनारी तर ९९ गावे खाडीकिनारी आहेत. १३६ गावे पूरप्रवण आहेत. या गावांना उधाणाचा फटका बसण्याची शक्यता आहे. भरतीच्या वेळी जोरदार पाऊस पडल्यास या गावांमध्ये पाणी शिरू शकते. या गावांमध्ये पूरस्थिती निर्माण झाल्यास करावयाच्या उपाययोजनांची तयारी आपत्ती व्यवस्थापन विभागाने सुरू केली आहे.

**४.५० मीटरपेक्षा उंच लाटा येणारे दिवस**

५ जून दुपारी ११.१७ वाजता ४.६१ मीटर, ६ जून दुपारी १२.०५ वाजता ४.६९ मीटर, ७ जून दुपारी १२.५० वाजता ४.६७ मीटर, ८ जून दुपारी १.३४ वाजता ४.५८ मीटर, २३ जून दुपारी १.०९ वाजता ४.५१ मीटर, २४ जून दुपारी १.५३ वाजता ४.५४ मीटर, २५ जून दुपारी १४.३६ वाजता ४.५३ मीटर, २२ जुलै दुपारी १२.५० वाजता ४.५९ मीटर, २३ जुलै दुपारी ०१.२९ वाजता ४.६९ मीटर, २४ जुलै दुपारी ०२.११ वाजता ४.७२ मीटर, (पान २ वर..)

# लोकसभा निवडणुकीनंतर उद्धव ठाकरेंना कायमची सुट्टी मिळेल -ना. नारायण राणे

**सिंधुदुर्ग : प्रतिनिधी**

रत्नागिरी-सिंधुदुर्ग मतदारसंघात महायुतीकडून भाजपचे केंद्रीय मंत्री नारायण राणे यांना उमेदवारी जाहीर करण्यात आली. यानंतर ना. नारायण राणे यांनी प्रचाराचा धडका लावला आहे. एका प्रचारसभेत बोलताना ना. नारायण राणे यांनी उद्धव ठाकरेंवर टीका केली आहे.



या लोकसभा निवडणुकीत ठाकरे गटाचा एकही खासदार येणार नाही. लोकसभा निवडणूक झाली की, १६पैकी दहा आमदार शिवसेनेत जातील. मग सहा राहतील. त्यापैकी किती येतील हे माहिती नाही. पुढच्या निवडणुकीनंतर उद्धव ठाकरेंना मातोश्रीवर कायमची सुट्टी मिळेल, कारण निवडणुकीनंतर आमदार, खासदार कोणीही राहणार नाही, या शब्दांत ना. नारायण राणे यांनी टीकास्त्र सोडले. आम्ही भारतीय संविधान बदलणार नाही यातून आमच्याविरोधात असंतोष निर्माण करण्याचा प्रयत्न सुरू आहे तसेच बाबासाहेबांच्या अनुयायांना भडकविण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे, अशी टीका ना. नारायण राणे यांनी केली.

आता दिल्लीत कॅबिनेट मंत्री आहे आणि पुन्हा निवडून आलो तर पुन्हा कॅबिनेट मंत्रिपद मिळेल, पण यांना काय मिळणार? या निवडणुकीत आमचे खासदार ४००पर्यंत जाणार आणि पुन्हा नरेंद्र मोदी पंतप्रधान होणार, मग दिल्लीत महाराष्ट्रात विकास कोण करू शकणार? कोकणात पूर येतो, दहा वर्षात पिण्याच्या पाण्याचा प्रश्न, बेरोजगारीचा प्रश्न, असा कोणता प्रश्न विनायक राऊत यांनी सोडवला नाही, या शब्दांत ना. नारायण राणे यांनी हल्लाबोल केला. दरम्यान, माझ्याएवढा राजकारणात नशीबवान कोणी नाही. अनेक लोकांना मी भेटत आहे. लोक मला एकच सांगत आहेत की, या वेळी तुम्हाला मतदान करायला मिळणार, हे आमचे नशीब आहे, असे उद्गार लोकांचे मला ऐकायला मिळत आहेत. १० वर्षांत मोदी यांनी भारताला अर्थव्यवस्थेत पाचव्या क्रमांकावर आणले.

आमच्या पंतप्रधानांवर भ्रष्टाचाराचे आरोप कोणी करू शकले नाहीत. कोणत्याही विषयात आमचे पंतप्रधान कमी पडत नाही प्रत्येक विषयावर त्यांची कमांड आहे गरिबांविषयी आस्था आहे, असे ना. नारायण राणे म्हणाले.

## घाटघर संच कार्यान्वित झाल्याने वाढीव वीज मागणीच्या काळात दिलासा

**मुंबई : प्रतिनिधी**

कमी-अधिक वीज मागणीच्या काळात विजेच्या ग्रीडला संतुलित करण्यासाठी घाटघर जल विद्युत केंद्राची महत्वाची भूमिका असते. अधिक वीज मागणीच्या काळामध्ये वीज पुरवठा करण्यामध्ये घाटघर उदंचन जल विद्युत प्रकल्प अत्यंत महत्त्वाचे योगदान देत असल्याने संच क्र. १ कार्यान्वित झाल्यामुळे उन्हाळ्यात वाढलेल्या वीज मागणीच्या पार्श्वभूमीवर राज्यातील वीज ग्राहकांना दिलासा मिळणार आहे.



घाटघर उदंचन जलविद्युत केंद्राची स्थापित क्षमता २५० मेगाव्हॅट असून प्रत्येकी १२५ मेगाव्हॅटच्या दोन संचांद्वारे सरासरी ४६८.१५ दशलक्ष युनिट्स वार्षिक वीज उत्पादन होत असते. या संचामध्ये स्टेटर अर्थ फॉल्ट आल्याने २० एप्रिल २०२२ ते १७ डिसेंबर २०२३पर्यंत हा संच बंद होता. या संचातून १७ डिसेंबर २०२३पासून वीज उत्पादन सुरू झाले, मात्र पंपिंग संचलन स्टॅटिक फ्रिकवेन्सी कन्व्हर्टरमध्ये तांत्रिक दोष निर्माण झाल्याने महानिर्मितीच्या अभियंता आणि तांत्रिक कर्मचाऱ्यांनी सुमारे साडेतीन महिने विशेष परिश्रम घेत आणि गुंतागुंतीच्या प्रणालीमध्ये संशोधन करून हा संच दुरूस्त करण्यात यश मिळवले.

फूजी जपान तंत्रज्ञानाच्या बनावटीचा हा संच २० एप्रिल २०२४ रोजी कार्यान्वित करण्यात आला.

या यशस्वी कामगिरीबद्दल महानिर्मितीचे अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक तसेच संचालक (संचलन) व कार्यकारी संचालक यांनी मुख्य अभियंता (जल) अभिजीत कुलकर्णी, अधीक्षक अभियंता गौतम कंबोज, कार्यकारी अभियंता ए. एस. मोरे, टी. एस. चौधरी व उपकार्यकारी अभियंता पी. बी. काशीव, निलेश भोळे आणि उन्मेष पाटील तसेच घाटघर चमू यांचे अभिनंदन केले आहे.

## श्री संत तुकाराम महाराजांच्या पालखीचे २८ जूनला प्रस्थान

**देहू : प्रतिनिधी**

जगद्गुरू श्री संत तुकाराम महाराजांच्या ३३९व्या पालखी सोहळ्याचे प्रस्थान २८ जून रोजी दुपारी २ वा. होणार आहे. या आषाढी वारी पालखी सोहळ्याच्या तयारीला श्री संत तुकाराम महाराज संस्थानच्या वतीने सुरुवात करण्यात आली आहे. त्याचाच एक भाग म्हणून बुधवारी (दि.२४) सोहळ्यासाठी संस्थानच्या वतीने सोहळा प्रमुखांची निवड जाहीर केली आहे.

लोणी काळभोर ते यवत हे सुमारे २० ते २५ किमी आहे. त्याचप्रमाणे लोणी काळभोर येथे सर्व दिंड्या बारस सोडून निघत असतात. पालखी उरुळी कांचन येथे दुपारच्या विश्रांतीच्या वेळी दिड तास गावात पालखी जाण्यात व येण्यासाठी दिड तास लागतो. त्यामुळे येथून पालखी निघण्यास उशीर लागत असल्याने यवत येथील मुक्कामी पोहचण्यासाठी उशीर लागतो. यामुळे उरुळी कांचन येथील ग्रामस्थांना विनंती करून दुपारचा विसावा पालखी मार्गावर म्हणजे महामार्गावर ठेवावा अशी विनंती करणार आहे. त्याच प्रमाणे लोणी काळभोर येथील मुक्कामही नवीन पालखी तळावर करणार असल्याची माहिती श्री संत तुकाराम महाराज संस्थानचे अध्यक्ष पुरुषोत्तम महाराज मोरे यांनी दिली.

## मच्छिमारांच्या न्यायासाठी अॅड. महेश मोहिते यांची उच्च न्यालयाकडे धाव

**मुरूड : प्रतिनिधी**

सुप्रसिद्ध जंजिरा किल्ल्याच्या मागील बाजूस पर्यटकांना उतरण्यासाठी जेट्टी बांधण्याचे काम सुरू आहे, तर समुद्रातील पाण्याचा प्रवाह रोखण्यासाठी संरक्षक भिंत बांधण्याचे काम सुरू आहे. यामुळे मच्छिमारांना मासेमारी करताना मोठा त्रास सहन करावा लागणार आहे. येथील मच्छिमारांना न्याय मिळवून देण्यासाठी मुंबई उच्च न्यायालयात राजपुरी येथील महालक्ष्मी मच्छिमार विविध कार्यकारी सोसायटीमार्फत जनहित याचिका दाखल करण्यात आली होती. या याचिकेचे कामकाज भाजपचे सरचिटणीस अॅड. महेश मोहिते व अॅड. आंजीत आनंद यांनी पहिले.





उच्च न्यायालयाचे सरन्यायाधीश देवेंद्र उपाध्याय व न्यायाधीश अरिफ डॉक्टर यांच्या खंडपीठाकडे सुनावणी झाली. न्यायालयाने महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाकडे या याचिकेबाबत प्रतिज्ञापत्र सादर करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे राजपुरी येथील मच्छिमारांना दिलासा मिळण्याची शक्यता वाढली आहे. मच्छिमारांना नुकसान भरपाई कशी देता येईल याबाबतसुद्धा विचारणा करण्यात आली आहे. सुनावणीवेळी मच्छिमार संस्थेचे सचिव सीताराम आगरकर, भालचंद्र आगरकर, नारायण चव्हाण, मुरलीधर घागरी आदी मान्यवर उपस्थित होते.

याबाबत सरचिटणीस अॅड. महेश मोहिते यांनी, वरळी सीलिंक पूल बांधताना स्थानिकांना ज्या प्रमाणात भरपाई देण्यात आली त्याच धर्तीवर येथील सुमारे ३००हून अधिक मच्छिमारांना कायमस्वरूपी नुकसान भरपाई मिळावी, असे सांगितले.

## आठव्या वर्धापन दिनानिमित्त ओरियन मॉल कार्निवल

**पनवेल : वार्ताहर**

पनवेलच्या सौंदर्यात भर टाकणाऱ्या आणि येथील रहिवाशांना मनोरंजन, खरेदीसाठी एकमेव पर्याय असलेल्या शहरातील ओरियन मॉल आपला वर्धापन दिन साजरा करीत आहे. यानिमित्त मॉलच्या वतीने ओरियन मॉल कार्निवल आयोजित केले आहे.

या कार्निवलमध्ये शॉप अँड वीनसारखी लकी ड्रॉ तसेच मॉलमध्ये सायकलिंगसह लहान मुलांसाठी जगलर, कार्टून पोशाखातील मेस्कॉट आणि बँड बॉईज असे विशेष आकर्षणाचे कार्यक्रम तर आहेत. वर्धापन दिन ग्राहक, विक्रेते व सर्व कर्मचारी यांससोबत २७ एप्रिल रोजी केक कापून साजरा करण्यात येणार आहे. १९ एप्रिल ते १९ मेदरम्यान हा कार्निवल चालणार आहे. या वेळी तीन हजारांपर्यंत खरेदी करणाऱ्या ग्राहकांना लकी ड्रॉद्वारे आकर्षक बक्षिसे मिळविण्याची संधीदेखील उपलब्ध करून देण्यात आली आहे.

या स्पर्धेतील विजेत्यांना ब्लू स्टोनतर्फे सोन्याचे दागिने तसेच लेकेअँम्पतर्फे ई-बाईक बक्षीस म्हणून देण्यात येणार आहे. या संधीचा फायदा घेण्यासाठी पनवेलकरांनी या कार्निवलमध्ये सहभागी होऊन मॉलला भेट देण्याचे अवाहन ओरियन मॉलचे मालक मंगेश परुळेकर, दिलीप करेलिया आणि मनन परुळेकर यांनी केले आहे.

## मतदार जागरूकतेसाठी प्रशिक्षण शिबिरांत मार्गदर्शन

**मुंबई : प्रतिनिधी**

मुंबई शहर जिल्ह्यामध्ये मतदानाची टक्केवारी वाढवण्याच्या दृष्टीने जनजागृतीसाठी स्वीप अर्थात मतदार जागरूकता आणि सहभाग कार्यक्रमांतर्गत विविध उपक्रम राबविण्यात येत आहेत. या उपक्रमांतर्गत नुकतेच भायखळा विधानसभा मतदार संघात दोन प्रशिक्षण शिबिर घेण्यात आली.



लोकसभा सार्वत्रिक निवडणूक-२०२४ च्या पार्श्वभूमीवर निवडणूक आयोगाने दिलेल्या सूचनेनुसार भायखळा येथील अण्णाभाऊ साठे सभागृहात बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या शिक्षकांसाठी आयोजित शिबिरात बृहन्मुंबई महानगरपालिका शिक्षण मंडळाच्या अखत्यारीतील शाळांमधील सुमारे ७०० शिक्षक या प्रशिक्षणात सहभागी झाले. प्रशिक्षणार्थींनी मतदानाची टक्केवारी वाढावी, यासाठी सूक्ष्म नियोजन कसे करावे, मतदारांना मतदानासाठी प्रेरित कसे करावे याबाबत मार्गदर्शन करण्यात आले.

भायखळा विधानसभा मतदारसंघात आयोजित दुसऱ्या प्रशिक्षण शिबिरात ३३ क्षेत्रीय अधिकारी, २५५ मतदान केंद्रस्तरीय अधिकारी, ३५ बचत गट कर्मचारी, १५७ अंगणवाडी सेविका, ६७ आरोग्य सेविका, १०५ कार्यालयीन कर्मचारी असे एकूण सुमारे ६५२ कर्मचारी सहभागी झाले. या शिबिरात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी आणि मतदाता दूत जसे अंगणवाडी सेविका/मदतनीस, आरोग्यसेविका, आशा स्वयंसेविका, स्वच्छता कर्मचारी यांना आवश्यक नेतृत्व कौशल्य, मुंबई शहर जिल्ह्याच्या मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी प्रशिक्षित व प्रेरित करण्यात आले.

प्रत्येक प्रशिक्षणार्थींने समूह भावना व लक्ष्यपूर्वक दृष्टिकोनातून २०० कुटुंबांतील मतदारांना कसे जोडावे आणि त्यांना मतदानासाठी कसे प्रेरित करावे, याबाबत माहिती देण्यात आली. प्रत्येक नागरिकाने आपला मतदानाचा हक्क बजावणे किती महत्त्वाचे आहे, त्यामुळे काय फरक पडू शकतो याचे महत्त्व मतदारांना पटवून देण्याविषयी शिबिरात मार्गदर्शन करण्यात आले. मतदानाचा हक्क बजावण्यासंदर्भातील संकल्पपत्र भरून घेणेबाबतही माहिती देण्यात आली.

या दोन्ही प्रशिक्षण शिबिरात मुंबई शहर जिल्हा स्वीप समन्वय अधिकारी डॉ. सुभाष दळवी यांनी मार्गदर्शन केले. या वेळी भायखळा विधानसभा मतदारसंघाचे सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी कृष्णा जाधव, अतिरिक्त सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी प्रतिभा वराळे, निवडणूक अधिकारी राजेश कंकाळ, उपनिवडणूक अधिकारी निसार खान आदी उपस्थित होते.

## रिपब्लिकन पक्षाचे लढवय्ये नेते गमावल्याचे दुःख -ना. रामदास आठवले

**खोपोली : प्रतिनिधी**

दलित चळवळीचे त्याचप्रमाणे रिपब्लिकन पक्षाचे लढवय्ये नेते साहेबराव धावारे यांना गमावल्याचे दुःख झाले आहे. धावरे यांनी दलित चळवळीला दिलेले योगदान संस्करणीय असणार आहे, असे प्रतिपादन केंद्रीय मंत्री तथा रिपब्लिकन पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष रामदास आठवले यांनी खोपोली येथे शोकसभेत व्यक्त केले.




रिपब्लिकन पक्षाचे माजी प्रदेश सरचिटणीस साहेबराव धावारे यांचे नुकतेच प्रदीर्घ आजारपणामुळे निधन झाले, त्यांना श्रद्धांजली वाहण्यासाठी सर्वपक्षीय शोकसभेचे आयोजन लोहाना समाज सभागृह येथे आयोजन करण्यात आले होते. या वेळी ना. आठवले यांनी धावारे यांच्या आठवणी जागवल्या.

दलित चळवळीत ज्या ज्या नेत्यांनी योगदान दिले. त्यामध्ये साहेबराव धावारे होते. त्यांनी आयुष्यभर समाजासाठी न्याय लढा दिला असे आठवले यांनी सांगताना रिपब्लिकन पक्ष त्याचप्रमाणे दलित समाज त्यांना कदापी विसरणार नसल्याचे सांगितले. प्रारंभी ना. आठवले यांनी साहेबराव धावारे यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करून अभिवादन केले.

त्यानंतर माजी नगराध्यक्ष दत्ताजी मसुरकर, भाजपचे ज्येष्ठ नेते सूर्यकांत देशमुख, वंचित बहुजन आघाडीचे शहराध्यक्ष दीपक गायकवाड, ज्येष्ठ पत्रकार कृष्णा साळुंखे, सूर्यकांत वाघमारे, त्याचप्रमाणे वरिष्ठ नेत्यांनी आपल्या शब्दांजली वाहताना साहेबराव धावारे यांच्या आठवणी जागवल्या. दत्ताजी मसुरकर यांनी नगराध्यक्ष असताना त्यांना स्वीकृत नगरसेवक करण्याबाबत प्रस्ताव ठेवला असता धावारे यांनी सत्तेत आपल्याला रस नसल्याचे सांगत, आपला जन्म केवळ समाजाच्या उद्धारासाठी असल्याचे सांगितल्याचे मसूरकर यांनी सांगितले.

सूत्रसंचालन रिपाई युवा नेते नरेंद्र गायकवाड यांनी केले. दि. धावारे यांचे ज्येष्ठ पुत्र अॅड. संदेश धावारे हे व्यासपीठावर उपस्थित होते.

पान १ वरून

## विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच कौशल्य गुण विकसित करावे- लोकनेते रामशेठ ठाकूर

या वेळी त्यांनी विद्यार्थ्यांना पदवी प्रमाणपत्र देऊन त्यांना आयुष्याच्या पुढील वाटचाली करता शुभेच्छा दिल्या. या पदवीदान समारंभावेळी प्राचार्य डॉ. के. एच शिंदे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की, विद्यार्थ्यांनी शिक्षणातून मिळणाऱ्या जीवन मूल्यांचा यथायोग्य वापर प्रत्यक्ष जीवनामध्ये करणे गरजेचे आहे. आजची तरुण पिढी उद्याचे भवितव्य ठरवणारी आहे. २०४७ पर्यत्त आपल्या देशाला जगातील नंबर एक ची महासत्ता बनवण्यासाठी तरुणांनी प्रयत्नांची पराकाष्टा करायला हवी आहे. काळ बदलत आहे, स्पर्धा वाढते आहे. आपण काळाची पाऊले ओळखून योग्य दिशेने पाऊल टाकणे आवश्यक आहे प्रतिपादन केले.

या कार्यक्रमाला महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश ठाकूर, उपप्रचार्य प्राध्यापक डॉ. एन बी. पवार, वाणिज्य शाखेचे विभाग प्रमुख प्राध्यापक जे. बी. वारघडे, उपप्राचार्य प्राध्यापक डॉ. राजाराम पाटील, प्राध्यापक प्रविण गायकर, डॉ. प्रफुल्ल वशेणीकर यांच्यासह विद्यार्थी, पालक तसेच सर्व प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर सेवक उपस्थित होते.

## जून ते सप्टेंबरदरम्यान समुद्राला उधाण

२५ जुलै दुपारी २.५१ वाजता ४.६४ मीटर,१९ ऑगस्ट दुपारी ११.४५ वाजता ४.५१ मीटर, २० ऑगस्ट दुपारी १२.२२ वाजता ४.७० मीटर, २१ ऑगस्ट दुपारी १२.५७ वाजता ४.८१ मीटर, २२ ऑगस्ट दुपारी १.३५ वाजता ४.८० मीटर, २३ ऑगस्ट दुपारी ०२.१५ वाजता ४.६५ मीटर, १७ सप्टेंबर सकाळी ११.१४ वाजता ४.५४ मीटर, १८ सप्टेंबर सकाळी ११.५० वाजता ४.७२ मीटर, १९ सप्टेंबर मध्यरात्री १२.१९ वाजता ४.६९ मीटर तर दुपारी १२.२४ वाजता ४.७८ मीटर, २० सप्टेंबर मध्यरात्री १.०३ वाजता ४.८४ मीटर तर दुपारी १.०२ वाजता ४.७० मीटर, २१ सप्टेंबर मध्यरात्री १.४७ वाजता ४.८२ मीटर तर दुपारी १.४२ वाजता ४.५० मीटर, २२ सप्टेंबर पहाटे २.३३ वाजता ४.६४ मीटर.

## वडिलांचे भांडण सोडविण्यासाठी गेलेल्या मुलाचा मारहाणीत मृत्यू

**अलिबाग :** वडिलांचे एका व्यक्तीबरोबर सुरू असलेले भांडण सोडविण्यासाठी गेलेल्या मुलाचा मृत्यू झाला. अजय वाघमारे असे या तरुणाचे नाव आहे. ही घटना सोमवारी (दि. २२) रात्री बुरुमखाण, वरसोली येथे घडली. याबाबत अलिबाग पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल केला असून राहुल वाघमारे (२२) याला पोलिसांनी अटक केली आहे. आरोपी राहुल याच्यावर जिल्हा रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

वरसोली बुरुमखाण येथील आदिवासीवाडीवर सोमवारी रात्री अजय वाघमारे याचे वडिल संतोष वाघमारे यांचे आणि आरोपी राहुल वाघमारे यांच्यात वाद निर्माण होऊन मारामारीपर्यंत विषय गेला होता. अजय वाघमारे असलेले भांडण मिटविण्यासाठी गेले. आरोपी राहुल वाघमारेने अजयला मारहाण केली. या मारहाणीत अजयाच मृत्यू झाला.

अजयच्या पत्नीने याबाबत अलिबाग पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. आरोपी राहुल वाघमारेविरोधात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला.

## दुखवटा

### धनंजय चाचड

**कर्जत :** कर्जत नगर परिषदेचे माजी नगराध्यक्ष धनंजय चाचड यांचे अल्पशा आजाराने ६६व्या वर्षी निधन झाले. अतिशय अभ्यासू व मृदू स्वभावाचे म्हणून ओळखले जाणारे चाचड यांनी अनेक वर्षे जिल्हा कॉंग्रेसचे सरचिटणीसपद सांभाळले होते. त्यांच्या अंत्यसंस्काराच्या वेळी माजी आमदार सुरेश लाड, माजी जि. प. सभापती पुंडलिक पाटील, माजी सभापती तानाजी चव्हाण, माजी नगराध्यक्ष वसंत भोईर, शरद लाड, राजेश लाड, माजी उपसभापती मनोहर थोरवे, माजी उपनगराध्यक्ष चंद्रकांत जाधव, उत्तम जाधव, राहुल डाळिंबकर, उमेश गायकवाड, अशोक ओसवाल, माजी नगरसेवक प्रवीण गांगल, हेमंत डोंबे, झुलकर नैन. डाभिया, पुंडलिक भोईर, सुनील गोगटे, राजेंद्र देशपांडे, विवेक दांडेकर, भाजप तालुकाध्यक्ष राजेश भगत, कॉंग्रेसचे तालुकध्यक्ष संजय गवळी आदींसह व्यापारी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. त्यांच्या पश्चात पत्नी, एक पुत्र, एक कन्या, सून, जावई व नातवंडे असा परिवार आहे.



### आनंदीबाई भासे

**कर्जत :** तालुक्यातील लाखरन गावात राहणाऱ्या आनंदीबाई रघुनाथ भासे यांचे वार्धक्याने ९१व्या वर्षी निधन झाले. त्या माजी उपसरपंच संतोष भासे यांच्या मातोश्री होत्या. त्यांच्या पश्चात दोन पुत्र, तीन कन्या, सूना, जावई, नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.



# प्रदूषण नियंत्रणासाठी पनवेल मनपाचे धूळशमन वाहन

## आयुक्तांनी घेतला आढावा




**पनवेल : प्रतिनिधी**

पर्यावरणाची गुणवत्ता वाढविण्यासाठी आणि नागरिकांना आरोग्यदायी राहणीमान देण्यासाठी पनवेल महापालिका पर्यावरण विभागाच्या वतीने खरेदी केलेल्या मल्टिपर्पज डस्ट सप्रेसशन व्हेइकल्स (धूळशमन वाहन) सज्ज झाल्या आहेत. या गाड्या कशा पद्धतीने काम करतात याचा आढावा आयुक्त डॉ. प्रशांत रसाळ यांनी नुकताच घेतला. या वेळी उपायुक्त डॉ. वैभव विधाते, मुख्य वैद्यकिय आरोग्य अधिकारी डॉ. आनंद गोसावी, घनकचरा व आरोग्य विभाग प्रमुख अनिल कोकरे, वाहन विभाग प्रमुख राजेश डोंगरे स्वच्छता निरीक्षक, अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

पर्यावरणाचे संतुलन जपण्यासाठी पनवेल महापालिकेने नुकतीच दोन अत्याधुनिक बहुउद्देशीय स्प्रेअर आणि डस्ट सप्रेशन व्हेइकल्स् खरेदी केली आहेत. अत्याधुनिक वैशिष्ट्यांसह सुसज्ज असलेली ही वाहने हवेतील धूलिकणांचा सामना करण्यासाठी उपयुक्त आहेत. यामध्ये फवारणी आणि साफसफाईच्या उद्देशाने ६००० लीटरची पाण्याची टाकी, एअर कर्टन-आधारित वॉटर मिस्ट सप्रेशन सिस्टीम, फ्रंट आणि रिअर रोड फ्लशिंग सिस्टीम, ग्रीन बेल्ट गार्डनिंग क्लिनिंग सिस्टीम, आणि उंच झाडांवरील धूळ साफ करण्याच्या दृष्टीने वैशिष्ट्यपूर्ण यंत्रणा यामध्ये समाविष्ट आहे.

ही वाहने दररोज अंदाजे ८० किमी अंतर पार करतात, ज्यामुळे पनवेल महानगरपालिका क्षेत्राचा विस्तृत परिसर स्वच्छ करणे सोपे होणार आहे. ही बहुउद्देशीय वाहने केवळ धूळ कमी करीत नाही तर रस्ता आणि दुभाजकांमधील हरितपट्टा स्वच्छ करण्यासही मदत करतात.

धूळ दाबणे आणि साफसफाई करण्यासाठी या वाहनामध्ये वापरण्यात येणारे पाणी हे मलनिस्सारण केंद्रातून प्रक्रिया केलेले पाणी वापरणार असल्याने गोड्या, चांगल्या पाण्याची बचत होणार आहे. पर्यावरणीय गुणवत्ता आणि सार्वजनिक आरोग्याच्या दृष्टीने ही वाहने दीर्घकालीन फायदे देणारी ठरणार आहेत.




# सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूलतर्फे मतदान जनजागृती

**उलवे नोड : रामप्रहर वृत्त**

रयत शिक्षण संस्थेच्या उलवे येथील सौ. शकुंतला रामशेठ ठाकूर स्कूल, उलवे येथे लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमिवर मतदानबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी विद्यार्थ्यांमार्फत विविध विषय घेऊन मतदारांना जागरूक करण्याचा एक अभिनव उपक्रम आयोजित करण्यात आला होता.

यामध्ये विद्यार्थ्यांनी चुनाव पर्व देश का गौरव २०२४ या विषयावर भाषण, चित्रकला आणि निबंध हे उपक्रम राबवून आपले एक मत किती महत्त्वाचे आहे, याबाबत मतदान जागृती रॅलीचे आयोजन केले होते. या रॅलीत विद्यार्थी, शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते. रयत शिक्षण संस्थेचे मॅनेजिंग कौन्सिलचे सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर, स्कूलचे चेअरमन परेश ठाकूर, शाळेच्या मुख्याध्यापिका मुक्ता खटावकर यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबवण्यात आला.

# चिपळे गावातील रस्ता कॉँक्रिटीकरण पूर्ण करावे

## भाजयुमो सरचिटणीस विश्वजीत पाटील यांची मागणी





**पनवेल : रामप्रहर वृत्त**

चिपळे ग्रामपंचायतीच्या ढिसाळ कारभारामुळे जे. पी. हॉटेल ते रिव्हेरा सोसायटीपर्यंच्या रस्त्याच्या कॉँक्रिटीकरणाचे काम रखडले असून ग्रामस्थांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे या रस्त्याचे काम आमदार प्रशांत ठाकूर यांच्या स्थानिक विकास निधीमधून करण्यासाठी ग्रामपंचायतीने परवानगी द्यावी, अशी मागणी भाजप युवा मोर्चा तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील यांनी निवेदनाद्वारे चिपळे ग्रामपंचायतीकडे केली आहे.

पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांच्या स्थानिक विकास निधीमार्फत चिपळे येथील जे. पी. हॉटेल ते रिव्हेरा सोसायटीपर्यंतचा रस्त्याचे कॉँक्रिटीकरण करण्यासाठी ग्रामपंचायतीकडे पाठपुरावा करून ठराव आणि दाखले देण्यात आले होते, मात्र ग्रामपंचायतीने या रस्त्याचे काम ग्रामनिधीमधून करण्याचे आदेश देऊन ३१ जानेवारीला सुरू केले. दोन महिन्यांचा काळ उलटूनही या रस्त्याचे काम अजूनही अपूर्ण असून रस्त्याच्या बाजूला डबर आणि खडी टाकण्यात आली आहे. यामुळे या रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या ग्रामस्थांना नाहक त्रास सहन करावा लागत आहे. त्यामुळे या रस्त्याचे काम लवकरात लवकर पूर्ण करा अन्यथा काम बंद करण्याचे आदेश देऊन, हा रस्ता आमदार प्रशांत ठाकूर यांच्या स्थानिक विकास निधीमधून पूर्ण करण्याची परवानगी द्यावी, अशी मागणी या निवेदनातून करण्यात आली आहे.

या वेळी माजी सरपंच रमेश पाटील, नेरे जि. प. भाजपचे अध्यक्ष सुनील पाटील, माजी उपसरंच मुकेश फडके, भाजपचे युवा तालुका सरचिटणीस विश्वजीत पाटील, समीर पाटील, दिनकर पाटील, समीर पद्माकर पाटील, प्रणील फडके, ॲड. रोहीत पाटील उपस्थित होते.

# आपत्कालीन परिस्थितीत पूर्वतयारीच्या अनुषंगाने अग्निशमन विभागाचे मॉकड्रिल

**पनवेल : वार्ताहर**

खारघरमधील एका इमारतीमधील लागलेल्या आगीतून अग्निशमन दलाने अडकलेल्या नागरिकांना बाहेर काढण्यात आल्याची माहिती खारघरमध्ये पसरताच एकच धावपळ उडाली, मात्र काही वेळाने कोणतीही आगीची घटना घडली नसून केवळ मॉकड्रिल असल्याचे समजताच नागरिकांनी सुटकेचा निःश्वास सोडला. हा मॉकड्रिल खारघर अग्निशमन केंद्राचे अग्निशमन अधिकारी प्रवीण बोडके यांच्या उपस्थितीत पार पडले.

अग्निशमन विभागाकडून दरवर्षी १४ ते २० एप्रिल या कालावधीत राष्ट्रीय अग्निशमन सेवा सप्ताह साजरा करण्यात येतो. खारघरमधील सिडकोच्या अग्निशमन विभागाकडून सेक्टर २०मधील एम्पायर इस्टेट इमारतीमध्ये आपत्कालीन परिस्थितीत पूर्वतयारीच्या अनुषंगाने मॉकड्रिल घेण्यात आली. त्यानुसार खारघर सेक्टर २०मधील एम्पायर इस्टेटमधून खारघर अग्निशमन केंद्रात सकाळी ११ वा. च्या सुमारास आग लागल्याची माहिती देण्यात आली. घटनेचे गांभीर्य लक्षात घेऊन अग्निशमन विभागाचे दोन बंब आणि २३ मजल्यापर्यंत पोहचेल, अशी सीडी घेऊन त्वरित घटनास्थळी रवाना झाले. घटनास्थळी प्रत्यक्ष कार्यवाही करत्यावेळी अग्निशमन जवानांनी धुरामुळे बेशुद्ध झालेल्या इसमाला त्वरित बाहेर काढत रुग्णवाहिकेतून जवळच्या दवाखान्यात रवाना केले, तसेच आगीवर पाण्याचा मारा करून नियंत्रण मिळवले, मात्र हे सगळे प्रत्यक्षात घडले नसून आपत्कालीन परिस्थितीची पूर्वतयारी म्हणून मॉकड्रिल घेण्यात आली होती.

# नवीन पनवेलच्या अत्रे कट्ट्यावर स्वरमाधुरी

**पनवेल** : नवीन पनवेलच्या आचार्य अत्रे कट्ट्याच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त १९६०च्या दशकातील अभंग, नाट्यगीते, हिंदी-मराठी चित्रपट गीतांची संध्याकाळ या कार्यक्रमांतर्गत स्वरमाधुरी या वाद्यवृदांचे आयोजन करण्यात आले आहे. रविवार (दि.२८) सायंकाळी ५.३० वा. सिडको गार्डन, अरुणोदय हॉस्पिटलच्या समोर सेक्टर ११ नवीन पनवेल येथे या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमास नागरिकांनी उपस्थित राहण्याच्या आवाहन अत्रे कट्ट्याचे अरविंद करपे यांनी केले आहे.



**पनवेल : ओटिकर कंपनीकडून पर्यावरण रक्षणासाठी कासप गावात प्लास्टिक बंदीबाबत जनजागृती करण्यात आली. यासाठी महिला वर्ग व ज्येष्ठ नागरिकांना कापडी पिशव्यांचे वाटप करण्यात आले. या वेळी कंपनी कंट्री हेड अश्विनी केस्वानी, हेराज खान, अहराज खान, शेहनाज खान, ॲनेसा डिसुजा, बिनोद प्रसाद, प्रताप नारकर, तुषार पाटील, प्रशांत पाटील आदी उपस्थित होते.**





**पनवेल : हनुमान जयंतीनिमित्त शहरातील स्वातंत्र्यवीर सावरकर चौकात असलेल्या हनुमान मंदिर तसेच पोदी येथील हनुमान मंदिरामध्ये कार्यक्रमांचे आयोजन मंगळवारी करण्यात आले होते. या मंदिरांत आमदार प्रशांत ठाकूर यांनी भेट देऊन दर्शन घेतले. या वेळी माजी नगरसेवक तेजस कांडपीळे उपस्थित होते.**

# उरणमध्ये देवीदेवतांच्या यात्रा, पालखी सोहळ्याची धूम

**उरण : प्रतिनिधी, वार्ताहर**



उरणमधील ग्रामीण भागात सध्या ग्रामदैवत, देवीदेवतांच्या यात्रा, पालखी सोहळ्याची धूम सुरू आहे. न्हावा गावची ग्रामदेवता गावदेवीचा यात्रोत्सव मंगळवारी तर पालखी सोहळा बुधवारी साजरा झाला.

समुद्रकिनाऱ्यावरील डोंगरातील निसर्गाच्या सान्निध्यात मंदिरात विराजमान असलेल्या न्हावा ग्रामस्थांची ग्रामदैवत असलेल्या गावदेवीवर भाविकांची अपार श्रद्धा आहे. यामुळे दरवर्षी गावदेवीच्या यात्रा, पालखी सोहळ्यासाठी भाविकांची दर्शनासाठी गर्दी उसळते. रात्री ९ वा. देवीची मिरवणूक काढण्यात आली. पालखी मिरवणूक गावभर फिरवण्यात आली. गुलाल उधळत विविध वाद्यांच्या तालावर नाचत पालखी मिरवणुकीत भाविक सहभागी झाले. भाविकांच्या उत्साहामुळे देवीची पालखी माघारी मंदिरात येण्यासाठी कधी-कधी २४ तासांहूनही अधिक कालावधी लागतो.

करंजा येथील द्रोणगिरी देवीची यात्रा पालखी सोहळा ३० एप्रिल ते १ मे रोजी साजरा करण्यात येणार आहे. द्रोणगिरी डोंगराच्या पायथ्याशी असलेल्या सुंदर, सुबक मंदिरात द्रोणगिरी देवी वसलेली आहे. भक्तांच्या हाकेला धावणारी, भक्तांच्या नवसाला पावणारी द्रोणगिरी देवी अवघ्या पंचक्रोशीतील आगरी-कोळ्यांची माऊली आहे. द्रोणागिरी देवीच्या यात्रा पालखी मिरवणूक हजारो भाविक सहभागी होऊन देवीच्या चरणी नतमस्तक होतात.

जसखार ग्रामस्थांची प्रसिद्ध ग्रामदेवता श्री रत्नेश्वरी देवीचा यात्रा पालखी उत्सवही दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा करण्यात येतो. यावर्षीही श्री रत्नेश्वरी देवीचा यात्रा पालखी सोहळा १ ते २ मे रोजी साजरा करण्यात येणार आहे. श्री रत्नेश्वरी देवीच्या दर्शनासाठी दरवर्षी लाखो भाविकांची गर्दी उसळते.

येत्या ८ ते १० दिवसांत गव्हाण गावची शांतादेवी, नवीन शेवा येथील शांतेश्वरी, फुंडा गावची घुरबादेवी आदी ग्रामदेवतांचाही यात्रा पालखी मिरवणूक सोहळा साजरा केला जाणार आहे. कोप्रोली गावची ग्रामदेवता जोगेश्वरी माता व बापुजी देव ७ ते ८ मे रोजी यात्रा उत्सव पार पडणार आहे. या यात्रेत देवकाठ्या नाचविण्याची प्रथा आहे. यात्रेतील भाविकांकडून देवकाठ्या नाचविण्याचा सोहळा पाहण्यासाठी भाविकांची यात्रेला मोठी गर्दी उसळते.

## खारघर स्टेशनजवळ आढळला मृतदेह

**पनवेल** : बेलापूर ते खारघर रेल्वेस्टेशनदरम्यान रेल्वे ट्रॅकजवळ एका अनोळखी व्यक्तीचा कुजलेला मृतदेह आढळला असून पनवेल रेल्वे पोलीस अधिक तपास करीत आहेत. या व्यक्तीचे अंदाजे वय ५० वर्षे असून उंची पाच फूट चार इंच, अंगाने मध्यम, अंगात पांढऱ्या रंगाचा हाफ टीशर्ट, त्यावर उजवे छातीवर व पाठीमागील बाजूस अटल भुजल योजना जळगाव असे प्रिंट केले आहे. फिकट ग्रे रंगाची पॅन्ट घातलेली आहे. या व्यक्तीबद्दल माहिती असल्यास पनवेल रेल्वे पोलीस ठाणे किंवा वपोनि प्रविण पाडवी (८८३०५३६१९२) यांच्याशी संपर्क साधावा.

# पनवेल पोलिसांनी मानले नागरिकांचे आभार

**पनवेल : वार्ताहर**

मार्च-एप्रिल महिन्यामध्ये आलेले सर्व सार्वजनिक उत्सव, सण शांततेत पार पाडल्याबद्दल पनवेल शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी सर्व नागरिकांचे आभार मानले आहेत.

यंदा मार्च आणि एप्रिल या दोन महिन्यात सर्व धर्मियांचे सण आल्याने यासंदर्भात पनवेल शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी पनवेल शहर पोलीस ठाणे हद्दीतील सर्व गावातील पोलीस पाटील, सरपंच, उपसरपंच, पंच कमिटी, उत्सव कमिटी (शहरी व ग्रामीण), ग्रामस्थ व शांतता कमेटी यांची बैठक आयोजित केली होती. व सर्वधर्म नागरिकांनी गुडी पाडवा, रमजान ईद, डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती, श्रीराम नवमी, महाविर जयंती व श्री हनुमान जयंती हे सर्व सण, उत्सव शासनाने घालून दिलेल्या नियमाप्रमाणे विहित वेळेत व शांततेत पार पाडले.

याबद्दल सर्व नागरिकांचे पनवेल शहर वरिष्ठ पोलीस निरीक्षक नितीन ठाकरे यांनी आभार मानले आहेत, तसेच येणारे आगामी सण उत्सवामध्ये असेच सहकार्य ठेवावे अशी अपेक्षा व्यक्त केली आहे.

## संपादकीय


# आश्वासनांची खैरात

लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यात प्रचारसभेत बोलताना पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी काँग्रेस पक्षाच्या अल्पसंख्याक धार्जिण्या जाहीरनाम्यातील जहरी राजकारणाचे नमुने जनतेसमोर ठेवल्याने काँग्रेसचा खरा चेहरा उघड झाला असून इंडिया आघाडीची त्यामुळे भंबेरी उडाली आहे.

**लोकसभा निवडणुकीच्या दुसऱ्या टप्प्यातील मतदान शुक्रवारी, २६ एप्रिल रोजी होणार असून या टप्प्यासाठीचा प्रचार बुधवारी थंडावला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची राजस्थानातील शेवटची प्रचारसभा मंगळवारी झाली. या सभेत बोलताना, धर्माच्या आधारे आरक्षणाचा विस्तार करायचा आणि दलित, मागासवर्गीय व आदिवासींना दिलेले अधिकार मुस्लिमांना द्यायचे असा काँग्रेसचा प्रयत्न असल्याचा आरोप मोदी यांनी केला. भाजप दलित, मागासवर्गीय आणि आदिवासींचे आरक्षण काढून घेणार नाही. तसेच धर्माच्या नावावर विभागलेही जाऊ देणार नाही, अशी हमीदेखील मोदींनी दिली. एकंदरीतच पंतप्रधान मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी चढवलेल्या जोरदार टीकेच्या हल्ल्यात काँग्रेसच्या जाहीरनाम्यातील वचनांचा पुरता फज्जा उडाला आहे. काँग्रेसचा अल्पसंख्याक धार्जिणा चेहरा कधीच लपला नव्हता. या लांगुलचालनाला कंटाळूनच भारतीय मतदारांनी २०१४ साली या पक्षाला सत्तेवरून खाली खेचले होते. गेल्या दहा वर्षांत सत्तेपासून दूर राहिल्यानंतर तरी हा पक्ष काही धडे शिकला असेल अशी अपेक्षा होती, पण तीदेखील आता फोल ठरली आहे. अमरावती येथे काँग्रेस खासदार राहुल गांधी यांची सभा बुधवारी दुपारी पार पडली. अमरावतीतील भाषणात त्यांनी काँग्रेसचे धोरण आणि स्वत:चे तत्त्वज्ञान अशी सरमिसळ साधली. त्यावर काँग्रेस कार्यकर्त्यांनाच हसावे की रडावे असे वाटले असेल. आपल्या भाषणात त्यांनी आश्वासनांची तुफान खैरात तर केलीच, पण आपण सत्तेवर आलो तर अल्पावधीत कोट्यवधी नागरिकांना लक्षाधीश बनवू असा दावाही केला. आपण सत्तेवर आलो तर कोट्यवधी महिलांना दरसाल एक लाख रूपये घरबसल्या देऊ असे आश्वासन त्यांनी दिले, परंतु ते आणि त्यांची इंडिया आघाडी सत्तेवर येण्याची शक्यताच नसल्याचे देशाची जनता नीट जाणून आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी राहुल गांधी यांना आपल्या भाषणात सडेतोड प्रत्युत्तर दिले. राहुल गांधी यांची स्वप्ने ही शेखचिल्लीची स्वप्ने आहेत असे अमित शहा म्हणाले. राहुल गांधी यांचे अर्थशास्त्रातील ज्ञान किती तोकडे आहे याचेही दर्शन त्यांच्या भाषणातून घडते आहे. त्यांच्या अपरिपक्वतेच्या दर्शनानेच आजवर काँग्रेस पक्षाचे नुकसान होत राहिले आहे. तरीही काँग्रेसी मानसिकतेचे नेते राहुल गांधी यांच्या नेतृत्वाबाबत कसे काय आग्रही असतात हे कळत नाही. दरम्यान, इंडिया आघाडी सत्तेवर आल्यास 'सीएए' कायदा रद्द केला जाईल अशी घोषणा काँग्रेस नेते पी. चिदंबरम यांनी केली आहे. त्यालाही केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी ताबडतोब सडेतोड प्रत्युत्तर दिले. सीएए कायद्याला हात लावून दाखवाच असे आव्हान शहा यांनी काँग्रेसला आणि तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी यांना दिले आहे. लांगुलचालनाच्या राजकारणाशिवाय या पक्षांना तरणोपाय नाही. त्यात आता पंतप्रधान मोदी तिसऱ्यांदा सत्तेवर येणार हे निश्चित असल्याने आपले काय होणार या चिंतेने या नेत्यांना ग्रासले आहे. त्यामुळेच बेधडक आश्वासनांची खैरात या नेत्यांकडून सुरू आहे, परंतु त्यातील फोलपणा कळण्याइतकी देशाची जनता नक्कीच सूज्ञ आहे.**

# पोलादपूरातील नद्यांच्या गाळसफाईची दरवर्षी गरज





**खबरबात**
**शैलेश पालकर**

पोलादपूर तालुक्यातील नद्या भौगोलिक परिस्थितीमुळे तीव्र उताराच्या ठिकाणी असल्याने नद्यांची पात्रं दूतर्फा मोठ्या प्रमाणात किनाऱ्यांची झीज करीत असल्याने याद्वारे निर्माण होणारा गाळ सोबत घेऊन वाहात असतात, परंतू पावसाची तीव्रता कमी झाली की हे प्रवाह या सोबत आलेल्या गाळामुळे लुप्त होऊन केवळ दगड-गोटयांनी भरलेल्या पात्राद्वारे नदीचे अस्तित्व शिल्लक राहते. या उथळ पात्रांमुळे पावसाळयात जशी पूरस्थिती दरवर्षी उद्भवत आहे; त्याचप्रमाणे उन्हाळयात अनेक गावांलगत नदीचे पात्र असूनही तीव्र पाणीटंचाईची झळ ग्रामस्थांना सहन करावी लागत आहे, यामुळे या नद्यांच्या पात्रांची गाळसफाई करण्याची गरज पाणीटंचाई अन् पूरस्थिती निवारणाच्या दुहेरी हेतूने निरर्माण झाली आहे. महाराष्ट्र ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत तालुक्यातील ढवळी, कामथी, चोळई, घोडवनी आणि सावित्री या पाच प्रमुख नद्या तीव्र उताराच्या असल्याने सर्वच नद्यांच्या खोऱ्यांमध्ये दगड, रेजगा आणि रेती अशी नैसर्गिक साधनसामग्री मोठया प्रमाणात दरवर्षी जमा होत असते. याखेरिज अन्य जोडनद्या आणि उपनद्यांची पात्रंही अशाच प्रकारे मुबलक प्रमाणात रेजगा, दगड-गोटे आणि रेतीसह भरलेली आहेत.

पोलादपूर तालुक्यात जलसंधारण विभागाकडून गेल्यावर्षी नदीतील दगड गोटे रेजगा यांची सफाई करून चरईत सावित्री नदी किनाऱ्यालगत ढिगारा रचण्यात आला. यानंतर ठेकेदाराने आपणच या नदीचे सर्वेसर्वा मालक तारणहार असल्याची भाषा सुरू करून वाळू उपसा करणाऱ्या सोसायटीलादेखील या माध्यमातून अंकित करीत वाळूमाफीया होण्याची संधी साधली आहे. या लघुपाटबंधारे विभागाच्या कंत्राटाचा गैरवापर करीत अधिकाधिक क्षेत्र संबंधित वाळूमाफीयाने आपल्या कब्जात असल्याचे सांगून एमआयच्या इंजिनियर्सचे देणे लागते, अशा आविर्भावात तालुक्यातील छोट्या वाळू व्यावसायिकांकडून घेणे सुरू केल्याची माहिती प्राप्त झाली. पुर्वी ज्यांना वाळूमाफीया म्हटले जात होते, सध्या त्यांच्याकडे गाळसफाईचा ठेका असल्याने या कामाबद्दल त्यांना मेहनताना मोबदला दिला जात असल्याची माहिती प्राप्त होत आहे. एकीकडे, वाळूविषयक धोरण बदलण्याची भुमिका राज्यसरकारने घेतली असताना महाड आणि पोलादपूर तालुक्यातील वाळुउपशाला पूरनियंत्रण कामाच्या हेडींगखाली गाळसफाईचे नांव दिले जात आहे. महसुल विभागाच्या बंधनानुसार या गौणखनिजाची उत्खनानंतर वाहतूक बेकायदेशीर असल्याने हा गाळउपसा केल्यानंतर नदीपात्रालगतच गाळाचे ढिगारे रचले जात आहेत.

पोलादपूर तालुक्यात गेल्या वर्षांपासून इरिगेशन विभागाचे कनिष्ठ अभियंता गाळउपसा करणाऱ्या ठेकेदारांच्या मेहेरबानीवर ऐशआरामात राहात असून महाड आणि पोलादपूर तालुक्यांमध्ये गेल्या काही दिवसांपूर्वी तब्बल चार कोटी रूपयांची बिले इरिगेशन विभागामार्फत गाळउपसा करणाऱ्या ठेकेदारांना अदा करण्यात आल्यानंतर या कनिष्ठ अभियंत्यांची चांदी झाल्याची माहितीही प्राप्त होत आहे. एकीकडे, या गाळउपसा मोहिमेने विशिष्ट समर्थकांची ठेकेदारी जोरदार सुरू असताना दुसरीकडे सावित्री नदीपात्रालगतच्या नागरिकांना चरई बाजूकडे रचण्यात आलेल्या गाळउपशाच्या ढिगाऱ्यांमुळे धोका निर्माण करण्याचा प्रकार घडल्याने सावध झालेल्या नागरिकांना ठेकेदारांच्याच गटातील अन्य समर्थक नेत्यांपर्यंत घेऊन जात असून आता हे गाळउपशानंतर रचलेले ढिगारे हटविण्यासाठीही जूनअखेरीस काम सुरू होण्याची शक्यता निर्माण झाली आहे. यामुळे पुन्हा ठेकेदारांना काम मिळाल्याने या समर्थकांनाही काहीसा लाभ होण्याची खात्री वाटू लागली आहे. २०२१ साली आलेल्या महापुरामध्ये पोलादपूर आणि चरईच्या नदीपात्रालगतच्या परिसरात सुमारे २५ फूट उंच पुररेषा निर्माण झाली असताना गाळाचा उपसा करून नदीपात्राची खोली अधिकाधिक वाढविण्यासाठी प्रयत्न होण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

पोलादपूर शहरातील श्रीदेवी गंगामाता घाटावरील नंदीची पाषाणमुर्ती २००५च्या अतिवृष्टीमुळे उत्तरवाहिनी सावित्री नदीला आलेल्या महापुरामध्ये वाहून गेली. यानंतर अनेकवेळा आलेल्या महापुरामुळे पोलादपूर येथील उत्तरवाहिनी सावित्री नदीचे पात्र उथळ होत गेल्याने दरवर्षी येणाऱ्या महापुराने पूररेषेचा उच्चांक प्रस्थापित केला. २०२१ मध्ये आलेल्या महापुरामुळे तालुका वाचनालयाच्या तळमजल्याच्या स्लॅबला लागलेल्या पुराच्या पाण्याने अधिकारी वाडयामध्येदेखील शिरकाव केला होता. दरवर्षी अतिवृष्टीसोबत नदीपात्राला येणाऱ्या महापुरामुळे उत्तरवाहिनी सावित्री नदीचे पात्र खुपच उथळ झाल्याने पुररेषा दरवर्षी उंचावत असल्याचे जाणवत आहे.

यासाठी २०२१ सारखी पुरपरिस्थिती पुन्हा उदभवू नये म्हणून राज्यसरकारने आपत्ती निवारण आणि गौणखनिज उत्खनन खात्यामार्फत नदीपात्रातील रेजगा आणि गोटे यांचा उपसा करण्याची कंत्राटे देऊन ठेकेदारही नेमले आहेत. यामुळे पोलादपूर तालुक्यातील सावित्री नदीपात्रात ठिकठिकाणी रेजगा व गोटे काढण्यासाठी यंत्रसामुग्रीचा वापर सुरू झाला आहे. मात्र, या उपशाबाबत महसूल यंत्रणेचे कोणीही तलाठी, मंडल अधिकारी अथवा नायब तहसिलदार पाहणी करण्यासाठी न फिरकल्यामुळे हे काम कोणत्या कार्यालयाच्या निरिक्षणाखाली सुरू आहे, याबद्दल स्पष्टता दिसून येत नाही.

## बदलते तंत्रज्ञान

### 'सॅमसंग'चा ट्रिपल कॅमेरा स्मार्टफोन बजेटमध्ये

सॅमसंगने या वर्षी मार्चमध्ये गॅलॅक्सी एफ१५ लाँच केला होता. त्याची सुरुवातीची किंमत १२,९९९ रुपये आहे. तर, या स्मार्टफोनसाठी कंपनीनं एक नवीन व्हेरिएंट लाँच केले आहे. जर तुम्हाला स्वस्तात मस्त अन् जबरदस्त फीचर्स असणारा स्मार्टफोन खरेदी करायचा असेल, तर हा स्मार्टफोन तुमच्यासाठी बेस्ट ठरेल, कारण सॅमसंग गॅलॅक्सीच्या या नवीन व्हेरिएंटमध्ये ८ जीबी रॅम आणि १२८ जीबी इंटर्नल स्टोरेज देण्यात आलं आहे. या स्मार्टफोनची किंमत १५,९९९ रुपये आहे.





गॅलॅक्सी एफ१५ स्मार्टफोनची खास गोष्ट म्हणजे या स्मार्टफोनमध्ये चार अ‍ॅण्ड्रॉइड ओएस अपग्रेड देण्यासह पाच वर्षांचं सिक्युरिटी अपडेट देण्यात आलं आहे. या स्मार्टफोनमध्ये अण्ड्रॉइड १४ आधारित वन युआय ६सुद्धा आहे तसेच हा स्मार्टफोन अ‍ॅश ब्लॅक, जॅझी ग्रीन व ग्रूवी व्हायोलेट अशा तीन रंगप्रकारांमध्ये उपलब्ध असेल.

हा स्मार्टफोन ९० एचझेड रिफ्रेश रेट आणि व्ही शेप नॉचसह ६.५ इंच एफएचडी प्लस अमोल्ड डिस्प्लेसह येतो तसेच मीडिया टेक डायमेंसिटी ६१०० प्लस ४/६ जीबी रॅम आणि १२८ जीबी इंटर्नल स्टोरेजसह ६ एनएम प्रोसेसरला सपोर्ट करतो. तसेच स्मार्टफोनमध्ये मायक्रोएसडी कार्ड आहे, जो १ टीबीपर्यंत स्टोरेज एक्सपान्शन करू शकेल.

स्मार्टफोनमध्ये ५० एमपी प्रायमरी कॅमेरा, ५ एमपी अल्ट्रा-वाइड अँगल लेन्स व २ एमपी मायक्रो लेन्ससोबत ट्रिपल कॅमेरा मागील सेटअपसह येतो. त्यात मायक्रोएसडी कार्ड स्लॉटसह समोर १३ एमपी सेल्फी कॅमेरादेखील आहे. सॅमसंग गॅलॅक्सी एफ १५ मध्ये ६,००० एमएएच बॅटरी आहे; जी त्याच्या यूएसबी-सी पोर्टद्वारे २५ डब्ल्यू फास्ट चार्जिंगला सपोर्ट करते. तर, २० हजारांपेक्षा कमी किमतीत तुम्ही हा जबरदस्त स्मार्टफोन खरेदी करू शकणार आहात.

भारतातील सर्वांत मोठी ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स कंपनी असलेल्या सॅमसंगकडून वेगवेगळे मोबाईल बाजारात आणले जातात. यामध्ये नवनवी फिचर्स असतात.

# चित्रपट अभिनेते शाहू मोडक



**निमित्त**

मराठी व हिंदी चित्रपट अभिनेते शाहू मोडक यांचा जन्म २५ एप्रिल १९१८ रोजी शाहू मोडक झाला. काही कलाकार प्रसिद्धी, पैसा यांना प्राधान्य न देता, केवळ कलेसाठी जगतात. त्यातील एक शाहू मोडक होते. शाहू मोडक यांचा पहिला चित्रपट 'श्यामसुंदर' आणि मुख्य म्हणजे पुण्यात निर्माण झालेला हा पहिला बोलपट होता. भारतीय चित्रपटसृष्टीच्या इतिहासात रौप्यमहोत्सवाचा पहिला मान 'श्यामसुंदर'ला मिळाला. मुंबईच्या 'वेस्टएन्ड' (नाझ) या चित्रपटगृहात तो सलग २७ आठवडे पडद्यावर झळकत होता. 'श्यामसुंदर'ची याशिवाय इतरही अनेक वैशिष्ट्यं होती. भारतातला तो पहिला 'बाल चित्रपट'. शिवाय मराठीसोबत त्याची हिंदी व बंगाली आवृत्तीही काढण्यात आली होती.

शाहू मोडक हे नाव घेतले की समोर संत ज्ञानेश्वर व भगवान श्रीकृष्ण यांच्या प्रतिमा आजही समोर येतात. जन्माने ख्रिश्चन असूनही शाहू मोडक यांनी संत ज्ञानेश्वर व भगवान श्रीकृष्ण यांच्या भूमिका उत्तमरीच्या साकारल्या. ते ज्ञानेश्वरांची भूमिका शब्दशः जगले. कारण त्यांनी त्या भूमिकेनंतर मांसाहार वर्ज्य केला होता. त्यांनी या भूमिकांमधून केवळ अभिनयच केला नाही, तर तो सात्विक भाव त्यांच्यामध्ये होता. संत ज्ञानेश्वर, माझा मुलगा, माणूस अशा २९ चित्रपटांत त्यांनी कृष्णाची भूमिका साकारली. त्यामुळे मराठी चित्रपटसृष्टीत शाहू मोडक अद्वितीय व्यक्तिमत्त्व होते.

लोक संत ज्ञानेश्वर म्हणून त्यांचेच फोटो घरी, देवघरात लावत असत, इतके त्यांच्या भूमिकेचे कौतुक झाले. 'माणूस' चित्रपटात नायकाच्या भूमिकेत शाहू मोडक, तर नायिकेच्या भूमिकेत शांता हुबळीकर होत्या. शाहू मोडक यांची नायकाच्या भूमिकेकरिता निवड झाली, तेव्हा ते पीळदार शरीरयष्टीचे नव्हते. रोजचा व्यायाम आणि खुराकाने त्यांची तब्येत मजबूत झाली, तेव्हाच चित्रीकरणाला सुरुवात झाली. शाहू मोडक यांची प्रत्यक्ष जीवनातील भूमिकाही तेवढीच तेजस्वी होती. रूपेरी पडद्यावर तर शाहूरावांनी अनेक विक्रम प्रस्थापित केलेच. माणूस, औट घटकेचा राजा, श्यामसुंदर, अमर समाधी, नरसी मेहता, झाला महार पंढरीनाथ अशा अनेक चित्रपटांमधील त्यांच्या भूमिका अजरामर ठरल्या. भगवान श्रीकृष्ण आणि संत ज्ञानेश्वरांची मानसिक अवस्था शाहू मोडकांमध्ये होती. म्हणून तितक्याच सहजतेने या दोन्ही भूमिका ते साकारू शकले.

अध्यात्म, तत्त्वज्ञान, ज्योतिष यांमध्ये रस असणारे शाहू मोडक व्याख्यानांद्वारे विवेकानंदांच्या तत्त्वज्ञानाचा प्रसार करत असत. शाहू मोडक यांचा ज्योतिषाचा अभ्यास चांगला होता. निर्मात्यांना चित्रपटाच्या शुभारंभासाठी व चित्रीकरणाचे मुहूर्तही ते काढून द्यायचे. शाहू मोडक आणि प्रतिभाताई जैन यांची ही प्रेमकहाणी अद्भुत आहे. शाहू मोडक हे ख्रिश्चन, तर प्रतिभा या जैन. जैन साध्वीचे व्रत झुगारून प्रतिभाताईंनी शाहू मोडक यांच्याशी लग्न करून एक इतिहास घडविला. शाहू मोडक यांचे ११ मार्च १९९३ रोजी निधन झाले. (साभार : बाईट्स ऑफ इंडिया)

**क्लिक...क्लिक...!**



**सातारा : पर्यटक महाबळेश्वरला आल्यावर प्रसिद्ध वेण्णा लेकमध्ये बोटिंगसाठी आवर्जून जातात.** (छाया : संस्कृती पाटील)

## आरोग्य प्रहर

### शरीरातील उष्णता कमी करण्यासाठी कांदा फायदेशीर

सध्या उन्हाळा सुरू झाला आहे. तापमानाचा पारा दिवसेंदिवस वाढत आहे. अशात अनेकांना वाढत्या उष्णतेमुळे शारीरिक थकवा आणि शरीरात पाण्याची कमतरता जाणवत आहे. यामुळे उष्माघातच नव्हे तर हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधित आजारांचा धोकासुद्धा वाढू शकतो. त्यामुळे आधीच हृदय व रक्तवाहिन्यांसंबंधित आजार असलेल्या लोकांनी काळजी घेणे आवश्यक आहे. अतिउष्णतेमुळे थकवा, चिडचिड आणि मानसिक आरोग्यावरही याचा दुष्परिणाम दिसून येतो. ही उष्णता कमी करण्यासाठी उन्हाळ्यात सॅलेड आणि जेवणामध्ये तुम्ही कांद्याचा समावेश करू शकता. नवी दिल्ली येथील इंद्रप्रस्थ अपोलो हॉस्पिटल्सच्या आहारतज्ज्ञ कनिका नारंग यांनी याविषयी सविस्तर माहिती दिली.



कांदा हा नैसर्गिकरित्या थंड असतो. त्यामुळे उन्हाळ्यात आहारामध्ये याचा समावेश महत्त्वाचा मानला जातो. कांद्यामध्ये असलेले पाणी शरीरातील पाण्याची कमतरता दूर करतात. याशिवाय यात सोडियम आणि पोटॅशियमची मात्रा अधिक असते, जे शरीरातील इलेक्ट्रोलाइट संतुलन राखण्यास मदत करतात. यामध्ये खनिजे आणि जीवनसत्त्वे विशेषत: व्हिटॅमिन सी भरपूर प्रमाणात असतात. या घटकांमुळे शरीराला पोषक घटक मिळतात आणि आपली रोगप्रतिकारशक्तीसुद्धा वाढायला मदत होते.

कांद्यामध्ये क्वेर्सेटिन आणि सल्फरसारखे पदार्थ असतात, जे शरीरातील घाम शोषून घेऊन शरीराला थंड करतात आणि उष्णता कमी करतात. क्वेर्सेटिन हिस्टामाइन्सला दूर पळवते. हिस्टामाइन्स या रसायनामुळे उष्णतेपासून आपल्याला लर्जी होऊ शकते.

कांदा पचनक्रियेशी संबंधित एन्झाइम्स सक्रिय करतात आणि त्यामुळे पचनक्रिया सुधारते. कांदा हा फायबर आणि प्रीबायोटिक्सचा चांगला स्त्रोत आहे, जे आतड्यांमधील बॅक्टेरियाला पोषक तत्वे पुरवतात. या बॅक्टेरियांमुळे फॅटी सिड तयार होते, जे पचनक्रियेसाठी फायदेशीर आहे.

कांद्यामधील क्रोमियम रक्तातील साखरेला नियंत्रित ठेवते. कांद्यामुळे वारंवार वॉशरूम लागते, ज्यामुळे शरीरातील विषारी पदार्थ बाहेर काढण्यास मदत होते. एका अभ्यासात सांगितल्याप्रमाणे कांद्याच्या अर्काच्या सिस्टीन सल्फोक्सिड या गोळ्या घेतल्यामुळे झोप सुधारते.

# महाड ते किल्ले रायगड मार्गाच्या कामासंदर्भात अधिकाऱ्यांना घेराव

## ६ जूनच्या आत काम पूर्ण करण्याचे आश्वासन

**महाड : प्रतिनिधी**

महाड ते किल्ले रायगड मार्गाचे काँक्रीटकरणाचे काम रखडले असून एक महिन्यावर पावसाळा आला तरी लाडवली पुल व कोंझर पुलाचे काम पुर्ण झालेले नाही. तसेच संपूर्ण रस्ता उखडून ठेवल्याने प्रवाशांना धुळीचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. संतप्त नागरिकांनी अखेर ठेकेदार व अधिकारींना घेराव घालत जाब विचारला. या वेळी महामार्ग विभागाच्या अधिकारी मेश्राम यांच्या समक्ष प्रोजेक्ट इंजिनिअर राजमाने यांनी ६ जूनपूर्वी हा रस्ता वाहतुकीस खुला होईल व लाडवली येथील पुलदेखील वाहतूकीस वापरता येईल अशी ग्वाही दिली.

मंगळवार २३ एप्रिल रोजी सायंकाळी किल्ले रायगडकडे जाणाऱ्या मुख्य रस्त्याच्या कामाची पहाणी करण्यासाठी संबंधित ठेकेदार अक्षय कन्स्ट्रक्शन व महामार्ग विभागाच्या अधिकारी मेश्राममॅडम लाडवली येथे आले असता त्यांना प्रवाशांच्या व नागरीकांच्या रोषाला सामोरे जावे लागले. गेली चार वर्षे महाड ते किल्ले रायगड मार्गाचे काम सुरू असून अद्याप ३० टक्केदेखील काम पूर्ण झालेले नाही. अक्षय कन्स्ट्रक्शन कंपनी हे काम करीत असुन लाडवलीदरम्यान रस्ता व पुलाचे काम रखडले असून पावसाळ पुर्वी जर हे काम पूर्ण झाले नाही तर रायगड विभागातील लोकांचे प्रचंड हाल होणार आहेत.



दरम्यान, या वेळी लाडवली गावातील नागरिक व रायगड विभागातील नागरिक तसेच शिवसेनेचे नेते बंधू तरडे, मनसेचे नेते चेतन उतेकर, भाजपचे महेश शिंदे (पत्रकार), काँग्रेसचे मुन्ना खांबे तसेच पत्रकार इलियास ढोकले व पोलीस खात्यातील अधिकारी सर्व विभागातील नागरिक जाब विचारण्यासाठी एकत्र येऊन अधिकारी व ठेकेदार यांना घेराव घातला व जाब विचारत महामार्ग कधीपर्यंत पूर्ण होईल, अशी विचारणा केली.

दरम्यान, जर एक महिन्यात लाडवली भागातील काम पूर्ण झाले नाही तर उग्रआंदोलन केले जाईल, असा इशारा देण्यात आला.

# माणगावमध्ये महायुतीचा मेळावा

## बॅरिस्टर अंतुलेंचा फोटो लावण्याचा अधिकार तुम्हाला कुणालाच नाही –खासदार तटकरे

**माणगांव : प्रतिनिधी**

माणगाव तालुक्यातील मोर्बा येथे सायंकाळी महायुतीचा अल्पसंख्याक मेळावा आयोजित करण्यात आला होता. या जाहीर मेळाव्यात महायुतीचे उमेदवार खासदार सुनील तटकरे यांनी शेकापवर जोरदार टीका केली. ते म्हणाले की, बॅरिस्टर अंतुलेंचा फोटो लावण्याचा अधिकार तुम्हाला कुणालाच नाही. आयुष्यभर अंतुले यांचा द्वेष करत या रायगड जिल्ह्यात आलात पण जयंत पाटील तुम्ही अंतुले यांच्या कृपेमुळे त्याठिकाणी राहिलात हे तुम्ही विसरता कामा नये.

सुनील तटकरे पुढे म्हणाले की, जगात खोटे बोलणारे कोण असतील तर ते शेकापचे जयंत पाटील व जितेंद्र आव्हाड हे दोघेजण आहेत. तुम्ही शेकापचे प्रदेश सरचिटणीस झालात आणि १९५२ पासून या जिल्हयात लोकसभेच्या निवडणुका झाल्या. तिथपासून काँग्रेस आणि तुमच्यात लढत झाली. तुम्ही नेतृत्व



घेतलंत आणि या जिल्हयातून शेकाप हद्दपार झाला. २००९ मध्ये शेकाप निवडणूकीत शिवसेनेची लाचारी करत गेला, तुम्ही उमेदवारांना पाठिंबा दिलात. रायगड आणि मावळ मतदारसंघात चार आमदारांची बेगडी तुम्ही शिवसेनेच्या पदरात पाडलीत. म्हणून तुम्हाला विधानसभेत यश मिळाले. त्या काळात बॅरिस्टर अंतुले यांचा पराभव झाला. बॅरिस्टर अंतुलेंचा फोटो लावण्याचा अधिकार तुम्हाला कुणालाच नाही. मनाचा दिलदारपणा अंतुलेनी दाखवला पण त्याच अंतुलेंच्या विरोधात तुम्ही काय काय बोलत आलात अशी घणाघाती टीका खासदार सुनील तटकरे यांनी मोर्बा येथे पार पडलेल्या प्रचार सभेत केली.

या मेळाव्याला शिवसेना प्रतोद आमदार भरत गोगावले, राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते मुश्ताक अंतुले, बाबा सिद्दीकी, राष्ट्रवादी काँग्रेस प्रदेश सरचिटणीस नजीब मुल्ला, अल्पसंख्याक सेल प्रदेशाध्यक्ष इद्रीस नायकवडी, प्रदेश सरचिटणीस लतिफ तांबोळी, डॉ. मुश्ताक मुकादम, नजीब असवारे, शिवसेना जिल्हाप्रमुख प्रमोद घोसाळकर, शिसवेना प्रवक्ते ॲड. राजीव साबळे, सुभाष केकाणे, संपर्कप्रमुख अरुण चाळके, रा. कॉ. विधानसभा अध्यक्ष चंद्रशेखर खानविलकर, युवक कार्याध्यक्ष शादाब गैबी, शिवसेना तालुकाप्रमुख ॲड. महेंद्र मानकर, अल्ताफ धनसे, मोर्बा सरपंच शौकत रोहेकर आदींसह महायुतीचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# ई–रिक्षाचे स्टिअरिंग हाती येणार असल्याने हातरिक्षा चालक समाधानी

**कर्जत : प्रतिनिधी**

मागील एका तपापासून पर्यावरण पूरक ई–रिक्षा सुरू होऊन सन्मानाचे जीवन जगता यावे. यासाठी गावातील त्याचप्रमाणे अन्य मंडळींच्या विरोधाचा सामना करत अनेकांच्या संघर्षाला सामोरे जात आपला लढा कायम ठेवल. अखेरीस आपली ई– रिक्षाची मागणी पूर्ण झाल्यामुळे हातरिक्षा चालकांनी समाधान व्यक्त केले आहे. सुप्रीम कोर्टाने वीस ई–रिक्षांना परवानगी दिली असून यापुढे हातरिक्षा चालकांच्या हाती लवकरच ई–रिक्षाचे स्टीयरिंग येणार असून या कष्टकरी श्रमिकांच्या संघर्षाला मिळालेले हे यश म्हणावे लागेल.

सुप्रीम कोर्टाने १० जानेवारी रोजी ई–रिक्षा हातरिक्षा चालकांना देण्यात याव्यात असा महत्वपूर्ण निर्णय दिला होता. त्याचवेळी सनियंत्रण समितीला ई–रिक्षाची संख्या निश्चित करणे व ई–रिक्षाची मार्गिका ठरविण्यास सांगितले होते. त्यानुसार सनियंत्रण समितीने दि ६ मार्च रोजी झालेल्या बैठकीत पहिल्या टप्प्यात २० ई रिक्षांची परवानगी दिली व अहवाल कोर्टाला सादर केला मात्र सनियंत्रण समितीच्या मिनिट्स मध्ये २० ई–रिक्षांचे वर्गीकरण १५ विद्यार्थ्यांना व ५ स्थानिकांना असे करून प्रामुख्याने या ई–रिक्षाच्या सेवेत पर्यटकांचा उल्लेख न केल्याने तर्क वितर्क सुरू झाले होते. श्रमिक रिक्षा संघटनेचे वकील ॲड. ललित



मोहन यांनी ई–रिक्षाची सेवा स्थानिक व पर्यटकांना देखिल देण्याची मागणी केली पर्यटन हाच येथील प्रमुख उद्योग असून दरवर्षी दहा लाख पर्यटक माथेरानला भेट देतात कायद्यात समानता आहे वाहतूक ही अत्यावश्यक सेवा असल्याने कोणत्याही समूहाला डावलता येत नाही तसेच वीस हात रिक्षा चालकांनी ई–रिक्षा खरेदी केल्या असून पर्यटकांना सेवा दिली तरच त्यांना उत्पन्न मिळू शकते.

ही बाब कोर्टाच्या निदर्शनास आणून दिली. न्यायमूर्ती बी आर गवई व न्यायमूर्ती संदीप मेहता यांनी ई–रिक्षाची सेवा स्थानिक व पर्यटकांना दिली जाईल असा स्पष्ट आदेश दिला आहे. तसेच जे परवानाधारक हातरिक्षा चालक आहेत यांनाच परवानगी द्यावी या चालकांचा सविस्तर अहवाल एक महिन्याच्या आत कोर्टाला सादर करण्याचे राज्य सरकारने आदेश दिले आहेत. त्यामुळे लवकरच हात रिक्षा चालकांच्या ई–रिक्षा माथेरानच्या रस्त्यावर धावताना दिसणार आहेत.

**पहिल्या टप्यात वीस ई – रिक्षांना मिळालेली परवानगी ही हात रिक्षा चालकांची अमानवीय प्रथेतून मुक्तीची सुरवात आहे व लवकरच उर्वरित ७४ हात रिक्षा चालकांना देखील ई – रिक्षाची परवानगी मिळेल ई – रिक्षामुळे त्यांना आरोग्यदायी व सन्मानाचे जीवन जगण्याची संधी मिळणार आहे.**
**–सुनील शिंदे,**
**याचिकाकर्ते व सचिव श्रमिक रिक्षा संघटना माथेरान**

**हात रिक्षा चालकांना ई रिक्षाची परवानगी दिल्या बद्दल मा सर्वोच्च न्यायालयाचे मनः पूर्वक धन्यवाद माथेरानच्या तीव्र चढ उताराच्या रस्त्यावर हातरिक्षा ओढताना मला माझ्या वाढत्या वयोमानानुसार प्रचंड दमछाक व्हायची ई रिक्षामुळे आमच्या आर्थिक परिस्थितीसह आरोग्य सुध्दा निश्चितच सुधारेल.**
**–अंबालाल वाघेला,**
**हातरिक्षा चालक, माथेरान**

# मध्य रेल्वे प्रवाशांना उन्हाळी हंगामात पुरवणार स्वस्त जेवण

**रोहे : प्रतिनिधी**

मध्य रेल्वे, भारतीय रेल्वे केटरिंग अँड टुरिझम कॉर्पोरेशन (आईआरसीटीसी)च्या सहकार्याने प्रवाशांना, विशेषत: अनारक्षित डब्यांमध्ये (जनरल क्लास कोच) स्वस्त दरात स्वच्छतापूर्ण अन्न आणि नाश्ता उपलब्ध करून देण्यासाठी एक नवीन उपक्रम घेऊन येत आहे.

उन्हाळ्याच्या महिन्यांमध्ये प्रवासांची अतिरिक्त गर्दी लक्षात घेऊन, भारतीय रेल्वेने अनारक्षित डब्यांमध्ये (जनरल क्लास कोच) प्रवास करणाऱ्या लोकांसमोरील आव्हाने ओळखली ज्यांना नेहमीच सोयीस्कर आणि परवडणारे अन्न पर्याय उपलब्ध नसतात त्यांच्यासाठी पुढाकार घेतला.

हा उपक्रम द्वि–पक्षीय दृष्टिकोन प्रदान करतो. परवडणारे जेवण, खिशासाठी अनुकूल २० रुपये किंमतीचे, हे जेवण प्रवास करताना प्रवाशांसाठी समाधानकारक आणि



किफायतशीर पर्याय प्रदान करते. न्याहारीचे जेवण, ज्यांना हलका नाश्ता हवा आहे त्यांच्यासाठी ५० रुपयांचे न्याहारी जेवणदेखील उपलब्ध आहे.

सुलभ प्रवास सुनिश्चित करण्यासाठी, हे जेवण आणि पाणी प्लॅटफॉर्मवरील अनारक्षित डब्यांच्या (सामान्य श्रेणीचे डबे) जवळ असलेल्या काउंटरवर उपलब्ध करून देण्यात आले आहे. या काउंटरवरून प्रवासी त्यांचा नाश्ता थेट खरेदी करू शकतात, त्यामुळे विक्रेत्यांना शोधण्याची किंवा स्टेशनच्या बाहेर जाण्याची गरज नाही.

मध्य रेल्वेवर फूड काउंटर ज्या स्थानकांवर उपलब्ध आहे.त्यामध्ये मुंबई विभाग – इगतपुरी आणि कर्जत भुसावळ विभाग – मनमाड, खंडवा, बडनेरा आणि शेगाव, पुणे विभाग – पुणे, मिरज, दौंड आणि साईनगर शिर्डी, नागपूर विभाग – नागपूर आणि वर्धा सोलापूर विभाग – सोलापूर, वाडी आणि कुर्डुवाडी ही रेल्वे स्थानके आहेत.

गेल्या वर्षी सुमारे ५१ स्थानकांवर या सेवेची यशस्वी चाचणी घेण्यात आली. चाचणीतील यशाच्या आधारावर, रेल्वेने कार्यक्रमाचा लक्षणीय विस्तार केला आहे, आता १०० हून अधिक स्थानकांवर आणि एकूण १५० काउंटरवर कार्यरत आहेत. भविष्यात आणखी स्थानकांचा समावेश करून या उपक्रमाचा आणखी विस्तार करण्याची योजना आहे.

हा कार्यक्रम प्रवाशांना, विशेषत: सामान्य वर्गाच्या डब्यातून प्रवास करणाऱ्यांना महत्त्वपूर्ण लाभ देतो. सहज उपलब्ध, परवडणारे अन्न आणि नाश्ता हे सुनिश्चित करतात की प्रवासी त्यांच्या संपूर्ण प्रवास सोयीस्कर होऊ शकतो.

# वाहतुकीचे नियम मोडणाऱ्यांना दंड

**अलिबाग : रामप्रहर वृत्त**

रायगड जिल्ह्यातील २८ पोलीस ठाण्याच्या अखत्यारीत असणारे वाहतूक शाखेचे अधिकारी व कर्मचारी यांनी मंगळवारी (दि. २३) वाहतुकीचे नियम भंग करणाऱ्या एकूण २३२ व्यक्तींवर कायदेशीर कारवाई केली.

यामध्ये सीटबेल्ट न लावणे, हेल्मेट न घालणे असे विविध वाहतूकीचे नियम भंग केल्याप्रकरणी त्यांच्याकडून १,९१,३०० रुपये इतका दंड आकारला आहे.


**Wanted Teachers**

**Wonderland School, Kharghar**

Managed by Archana Charitable Trust
G-60, 31-32, Sector 12, Kharghar

**Wanted Teachers - Primary & Secondary Section**

1. **English Teacher** - B.A./M.A. B.Ed.
2. **Mathematics Teacher** - B.Sc./M.Sc. B.Ed.
3. **Science Teacher** - B.Sc./M.Sc. B.Ed.
4. **Social Studies Teacher** - B.A./M.A. B.Ed.

Apply with latest resume and passport size photo on wonderlandkharghar@gmail.com
Also on Whatsapp No. **8454843726**


# रोह्यातील हरवलेली मुलगी सापडली

**रोहे : प्रतिनिधी**

रोहा पोलीस ठाण्यात १० एप्रिल रोजी अल्पवयीन मुलगी अपहरण झाल्याची तक्रार तीच्या वडिलांकडून देण्यात आली होती. तीचा शोध रोहा पोलिसांनी घेतला असून तिचा अपहरण झाला नसून ती तीच्या आईकडे राहण्यासाठी गेल्याचा उलगडा पोलीस तपासात झाला आहे.

अल्पवयीन अपहृत मुलगी संकलित करता कर्नाटक राज्यात असल्याची माहिती मिळाल्याने पोलिसांचे पथक कर्नाटक राज्यात गेले व मुलगीचा शोध घेतला.

अल्पवयीन मुलीला पोलीस ठाण्यात आणून विचारपूस करता, तिचे आई वडील गेले एक वर्षापासून वेगवेगळे राहत असून वडील आईसोबत बोलू देत नाहीत, ओरडतात या रागातून ती स्वतः १० एप्रिल रोजी रोहा येथील राहते घरातून ऐकटी निघून तिच्या आईकडे कर्नाटक येथे गेली होती.


## जाहीर नोटीस

तमाम जनतेस ह्या जाहीर नोटीसीने असे कळविण्यात येते की, आमचे अशील दिलीप बाळाराम मढवी रा. उसाटणे, ता.अंबरनाथ, जि.रायगड यांनी मौजे वाजापूर, ता. पनवेल, जि. रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत खरेदी करण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे–वाजापूर, ता. पनवेल, जिल्हा रायगड**

| गट नं. | हिस्सा नं. | भोगवटाधारक | क्षेत्र (हे.आर.पॉ.) | आकार रु.पै. |
|---|---|---|---|---|
| २५ | २ | उद्धव दिपक ठाकूर<br>दिपिका दिपक ठाकूर<br>राजेश पुंडलिक पाटील<br>रुतिक दिपक पाटील<br>वैजयंती विठ्ठल पाटील<br>हिराबाई पुंडलिक पाटील<br>प्रदिप पुंडलिक पाटील | ०–५५–५०<br>०–०९–०० वरकस<br>०–१०–४० पोटखराबा<br>**०–७४–९० एकूण** | ८.८१ |

सदर जमीन मिळकतीपैकी भोगवटाधारक यांचे मालकीची ०–३०–९० गुंठे जमिनीसंबंधी...

तरी वरील मिळकतीच्या बाबतीत अन्य कोणाचाही हक्क, हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, साठेकरार, वचनपत्र, कुळ, वहिवाट, लिज, इजमेंट, वारसाहक्क वगैरे इतर कोणत्याही प्रकारचा हक्क असल्यास त्यांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपली लेखी हरकत प्रथमदर्शनी पुराव्यासहीत खालील सही करणार यांचेकडे रजि. पोस्टाने अथवा समक्ष दाखल करावी. वरील मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास वरील मिळकती या निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून सदरचे मिळकतीचे खरेदीचा व्यवहार पूर्ण केला जाईल व उशीरा येणाऱ्या हरकती आमच्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

ता. २५/०४/२०२४ **सही /–**
पनवेल **ॲड. के. के. गोंधळी**
१३५, नगरपालिका कॉम्प्लेक्स, ता.पनवेल, जि. रायगड. मोबाईल : ९७६८३७३२५५

## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीशीने कळविण्यांत येत आहे की, आमचे अशिल खालील परिशिष्टात वर्णन केलेली जमिन मिळकत ही त्यापुढे नमूद केलेल्या जमिन मालकाकडून विकत घेण्याच्या विचारात आहेत. सदर मिळकतीचे वर्णन पुढीलप्रमाणे :–

**मौजे – वारदोली, तालुका–पनवेल, जिल्हा–रायगड.**

| भुमापन नं./हि.नं. | क्षेत्र हे.आर.चौ.मी. | आकार रु.पै. | जमीन मालकांचे नाव |
|---|---|---|---|
| ४८/९ | ०–२७–२०<br>पो.ख. ०–०२–६०<br>एकूण ०–२९–८० | ३.६२ | श्री. नाना तुक्या तांडेल |

वर वर्णन केलेली जमीन मिळकत अथवा तिच्या कोणत्याही एका भागावर यापुर्वी विक्री, देणगी, दान, मक्ता, वहिवाट, ताबा, देखभाल, गहाण, कुळ अथवा अन्य कोणताही हक्क असलेल्या सर्व संबंधितांनी ही नोटीस प्रसिध्द झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आपल्या लेखी हरकती कागदोपत्रांसहीत व पुराव्यासहित खाली सही करणार यांचेकडे पोहोच कराव्या अथवा रजिस्टर्ड पोस्टाने दाखल कराव्या. वरील मुदतीत कोणाकडून काही लेखी हरकत, तक्रार, दावा न आल्यास सदर मिळकत निर्वेध, बोजारहीत असून त्यावर कोणत्याही प्रकारचा दावा, हक्क, हितसंबंध नाही असे समजून आमचे अशिल सदर मिळकतीचा व्यवहार पूर्ण करतील व त्यानंतर आलेल्या कोणत्याही प्रकारच्या हरकती, तक्रारी, दावे आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत व त्या सोडून दिल्या आहेत असे गृहित धरुन सदरचा व्यवहार पूर्ण केला जाईल याची तत्सम लोकांनी कृपया नोंद घ्यावी.

पनवेल. **सही/–**
दि. २४/०४/२०२४. **ॲड. प्रशांत अशोक भुजबळ**
कार्यालय : २, आशादिप अपार्टमेंट वासुदेव बळवंत फडके नाट्यगृहाजवळ अनिल झेरॉक्सच्या बाजूला, पनवेल
मो. क्र.: ९९३०३६९८६१

**Namrata Park Co-Operative Housing Society Ltd.**
Plot No. 108/1, near Diamond Park, Panvel - 410206.
District - Raigad, Maharashtra.

**NOTICE INVITING OFFERS**

Sealed offers are invited from Reputed & Qualified Developers for Redevelopment Proposal as detailed hereunder :

| | |
|---|---|
| Name of Society | Namrata Park Co-Op Housing Society Ltd. |
| Name of Work | Proposed Redevelopment of Existing G+2 floors building at Plot No. 108/1, near Diamond Park, Panvel - 410206. |
| Details | Plot Area - 620 Sq.m. No. of tenants - 13 Nos. |
| Cost of Tender Documents | 1000/- by DD/Cash in favour of Namrata Park Co-Op Housing Society Ltd. |
| Date of issue of Tender | 26th April 2024 |
| Last date and time for issue of tender | 04th May 2024 till 7:00 PM |
| Last date and time for submission of tender | 11th May 2024 till 7:00 PM |

Sealed Offers with Company Profile, Proposal & References to be submitted at Namrata Park Co-Op Housing Society Ltd. Plot No. 108/1, near Diamond Park, Panvel - 410206.

Project management Consultant
**ASAP**
C6-7, 1:1, First Floor, Road No. 03.
Sector 18, CIDCO Colony,
New Panvel. Panvel - 410206.
Contact - 9820002850

Namrata Park Co-Op Housing Society Ltd
Plot No. 108/1, near Diamond Park, Panvel.
**Contact -**
Keshav Desai - 9969004110
Sunil Wadikar - 9819565927

Sd/- Chairman | Sd/- Secretary | Sd/- Treasurer

For Namrata Park Co-op. Hsg. Soc. Ltd.

# आचारसंहितेचे काटेकोर पालन करा

## नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांचे निर्देश

**नवी मुंबई : बातमीदार**

लोकसभा सार्वत्रिक निवडणूक २०२४ च्या अनुषंगाने सर्वत्र आदर्श आचारसंहिता लागू झालेली असून आचारसंहिता पालन केली जात असल्याबद्दल विभागीय पातळीवर काटेकोरपणे दक्ष रहावे व कोणत्याही प्रकारे आचारसंहितेचे उल्लंघन होणार नाही याची काळजी घ्यावी असे निर्देश महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी याबाबतच्या आढावा बैठकीत दिले.



आदर्श आचारसंहितेच्या नियमानुसार प्रचार फलक यांना परवानगी देण्यात यावी. परवानगी देताना सर्वांना समान न्याय देण्यात यावा. अशाच प्रकारे प्रचारासाठी मैदाने उपलब्ध करून देण्याबाबतही समान भूमिका ठेवण्यात यावी. कोणत्याही प्रकारे विनापरवानगी होर्डींग, बॅनर्स, झेंडे लागणार नाहीत याची दक्षता घ्यावी. याचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास नियमानुसार कायदेशीर कारवाई करण्यात यावी. तसेच खाजगी संस्थांच्या जाहिरातीही हटविण्यात याव्यात. उद्घाटने, शुभारंभ यांच्या कोनशिला झाकून घेण्यात याव्यात. अशा सर्व बाबींकडे आठही विभागांचे सहा.आयुक्त तथा विभाग अधिकारी यांनी क्षेत्रीय स्तरावर स्वत: पाहणी करून गांभीर्याने लक्ष द्यावे असे आयुक्तांनी स्पष्ट निर्देश दिले. त्याचप्रमाणे एनएमएमटी बसेस व बसस्थानके याठिकाणीही विनापरवानगी फलक लागणार नाहीत याची दक्षता घेण्याच्या सूचना देण्यात आल्या.

यासोबतच लोकसभा सार्वत्रिक निवडणूकीत मतदानाची टक्केवारी वाढण्याच्या दृष्टीने विविध प्रसार माध्यमांचा अधिक चांगला उपयोग करून व्यापक जनजागृती करावी, असेही निर्देश आयुक्तांनी दिले. यामध्ये, विभाग कार्यालय पातळीवर मतदान जनजागृती कक्ष स्थापन करावा व या कक्षाव्दारे नागरिकांना मतदानाविषयी, त्यांचा मतदार क्रमांक व मतदान केंद्र आदी बाबींविषयी माहिती द्यावी, मतदान करण्यासाठी संपर्क साधून प्रोत्साहित करावे असे निर्देश आयुक्तांनी दिले. त्याचप्रमाणे आपापल्या विभागीय क्षेत्रातील सोसायटचा, वसाहती, उद्योगसमुह याठिकाणी भेटी देऊन मतदान करणेविषयी जनजागृती करण्याचेही आयुक्तांनी निर्देशित केले.

### व्यापक जनजागृतीही आवश्यक

**लोकसभा सार्वत्रिक निवडणूक सुव्यवस्थित रितीने पार पडणे ही आपली सर्वांची जबाबदारी असून त्याकडे काटेकोर लक्ष देण्यासोबतच या निवडणूकीमध्ये प्रत्येक मतदाराने आपला मतदानाचा हक्क बजावण्यासाठी व्यापक जनजागृती करण्याकडेही विशेष लक्ष देण्याचे निर्देश नमुंमपा आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांनी संबंधित विभागांचे विभागप्रमुख व सहा. आयुक्त तथा विभाग अधिकारी यांना आढावा बैठकीत दिले.**

लोकसभा निवडणूकीत प्रत्येक नागरिकाने आपला मतदानाचा हक्क बजावावा यादृष्टीने क्षेत्रीय स्तरावर मोठ्या प्रमाणावर जनजागृती करण्याची आवश्यकता लक्षात घेऊन रेल्वे स्टेशन, बसडेपो, मार्केट, मॉल, मार्ट्स, सिनेमागृहे, नाट्यगृहे, मंगल कार्यालये, रूग्णालये, सभागृहे, उद्याने अशा वर्दळीच्या ठिकाणी विविध माध्यमांतून मतदानाविषयी व्यापक स्वरूपात जनजागृती करण्याचे आयुक्तांनी निर्देशित केले. याशिवाय फेसबुक, ट्विटर, इन्स्टाग्राम, व्हॉट्सप अशा समाजमाध्यमांचाही प्रभावी वापर करावा तसेच एनएमएमटी बसेसवर फलक लावून व बसेसमध्ये ऑडिओ सूचना प्रसारित करून जनजागृती करण्याचे सूचित करण्यात आले.

प्रचार, प्रसिध्दीप्रमाणेच मतदान केंद्रांची सर्व आवश्यक सुविधांसह सिध्दता करून ठेवण्याचेही आयुक्तांमार्फत निर्देशित करण्यात आले. ही केंद्रे मा.निवडणूक आयोगाने सूचित केल्याप्रमाणे तळमजल्यावर असावीत असे सूचित करीत या केंद्रावर पाणी, विद्युत, स्वच्छतागृहे, रॅम्प अशा व्यवस्थेसह प्रामुख्याने व्हिलचेअरचीही व्यवस्था करणेबाबत आयुक्तांनी निर्देश दिले.

# नवी मुंबईत राष्ट्रीय योगासन स्पर्धा


**नवी मुंबई : बातमीदार**

१७वी राष्ट्रीय योगासन स्पर्धा २७ एप्रिल रोजी नेरूळ नवी मुंबई पालिका शाळा १०१ नवी मुंबई येथे होणार आहे. आर्ट ऑफ लर्निंग फाऊंडेशनतर्फे राष्ट्रीय योगासन चॅम्पियनशिप, नवराष्ट्र-२०२४चे आयोजन करण्यात आले आहे. नवी मुंबई, महाराष्ट्र येथे होणाऱ्या या राष्ट्रीय योगासन स्पर्धेमध्ये देशभरातील योग अभ्यासक सहभागी होणार आहेत.

फाऊंडेशनच्या अध्यक्षा डॉ. रीना अग्रवाल यांनी सांगितले की, योगासन स्पर्धा हा योग आणि त्याचे संपूर्ण आयाम सध्याच्या तरुण पिढीला उपलब्ध करून देण्याचा सुवर्ण प्रयत्न आहे. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी नवी मुंबई चॅम्पियन्स सर्व्हिस फाऊंडेशन प्रयत्नशील आहे.

नवी मुंबई चॅम्पियन्स फाऊंडेशनचे अध्यक्ष डॉ. प्रताप मुदलियार हेदेखील या स्पर्धेच्या माध्यमातून निरोगी भारत समृद्ध भारत अभियान साकारण्यासाठी आपले महत्त्वपूर्ण सहकार्य करत आहेत. या स्पर्धेत महाराष्ट्र, राजस्थान, गुजरात, आसाम, आंध्र प्रदेश, मध्य प्रदेश, गुजरात, पश्चिम बंगाल, कर्नाटक, केरळ, तामिळनाडू आणि दिल्ली येथील योगसाधक सहभागी होणार आहेत. या स्पर्धेत सर्व शाळा, महाविद्यालये, योग केंद्रे, स्वयं उमेदवार आणि महापालिका शाळांचे विद्यार्थीदेखील सहभागी होऊ शकतात. या आंतरराष्ट्रीय योग आसन स्पर्धेत सहभागी होण्यासाठी तुम्ही ८०८०२१२८५१ या क्रमांकावर संपर्क साधू शकता.

# ऑलिम्पियाडमध्ये निमय जाधवची उत्कृष्ट कामगिरी



**नवी मुंबई : बातमीदार**

सिल्वर झोन फाउंडेशनतर्फे आयोजित हिंदी ओलिम्पियाड स्पर्धेत पनवेलच्या न्यू होरायझन शाळेचा विद्यार्थी निमय जाधव याने उत्कृष्ट कामगिरी केली.

निमय जाधव इयत्ता पहिलीत शिकत आहे. या हिंदी ओलेम्पियाड स्पर्धेत त्यांनी संपूर्ण इयत्तेत तृतीय स्थान प्राप्त केले. तर संपूर्ण राज्यात ५७ वे स्थान प्राप्त केले. त्याला ब्राँझ मेडल व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले. त्याच्या यशाबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक होत आहे.

# पत्रलेखनाद्वारे विद्यार्थ्यांनी केले पालकांना मतदानाचे आवाहन



**नवी मुंबई : बातमीदार**

संविधानाने दिलेला मतदानाचा अधिकार प्रत्येक नागरिकाने २० मे रोजी होत असलेल्या ठाणे लोकसभा निवडणूकीत हक्काने बजावावा याकरिता विविध माध्यमांतून जनजागृती करण्यात येत असून मतदानविषयक प्रचार, प्रसाराच्या स्वीप कार्यक्रमांतर्गत १५० ऐरोली व १५१ बेलापूर विधानसभा मतदारसंघ कार्यालयाच्या वतीने वेगवेगळे उपक्रम राबविण्यात येत आहेत. लोकसभा निवडणूकीत मतदानाची टक्केवारी वाढविण्यासाठी विविध माध्यमांतून प्रयत्न करण्यात येत असून मुलांनी मागणी केलेल्या एखाद्या गोष्टीला पालकांकडून उत्तम प्रतिसाद मिळतो हे लक्षात घेत पत्रलेखन हा अभिनव उपक्रम राबविण्यात आला. याव्दारे विद्यार्थ्यांनी आपले आई-बाबा यांना पत्र लिहून त्यांनी येत्या लोकसभा निवडणूकीत संविधानाने दिलेला मतदानाचा हक्क बजावावा असे आवाहन केले. नवी मुंबई महानगरपालिका शाळांप्रमाणेच खाजगी शाळांतून हा उपक्रम उत्साहाने राबविण्यात आला. अनेक शाळांनी त्याकरिता आपल्या विद्यार्थ्यांना पोस्टकार्ड, अंतर्देशीय पत्र उपलब्ध करून दिली होती.

'माझ्या उज्ज्वल भविष्यासाठी, लोकशाही बळकट करण्यासाठी नक्की मतदान करा' असा आईबाबांना आग्रह करणारे हे पत्रलेखन मुलांकडून आपल्या पालकांना त्यांच्या मतदानाच्या अधिकाराची जाणीव करून देणारे होते. या पत्रलेखनातून मुलांमार्फत मतदार पालकांना आवाहन तर करण्यात आलेच शिवाय सध्याच्या समाज माध्यमांतून संदेश आदानप्रदानाच्या तंत्रस्नेही युगात पत्रलेखनासारख्या दुर्मीळ होत चाललेल्या माध्यमाचा आनंदही याव्दारे विद्यार्थ्यांना घेता आला. त्यामुळे विद्यार्थ्यांनी अतिशय आनंदाने पालकांनी मतदान करावे असे आवाहनपत्र लिहिले व पालकांनीही या पत्रलेखन उपक्रमाचे भरभरून कौतुक केले.

महापालिका आयुक्त डॉ. कैलास शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली महानगरपालिकेच्या शाळांसह खाजगी शाळांमध्येही शिक्षण विभागाच्या नियंत्रणाखाली या अभिनव उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

# पनवेलमध्ये बेसिक प्राणिक हिलिंग कार्यशाळा

**पनवेल** : प्राणिक हिलिंग हि एक विना स्पर्श विना औषधी उपचार पद्धती असून विविध शारीरिक, मानसिक आजारांमध्ये फलदायी ठरते. यासाठी मैत्रेय प्राणिक हिलिंग सेंटरतर्फे बेसिक प्राणिक हिलिंग कार्यशाळा पनवेलमध्ये २७ व २८ एप्रिल या दोन दिवसांसाठी आयोजित केली आहे. या कार्यशाळेचे स्वरूप प्रशिक्षणाचे असल्यामुळे यामध्ये स्वतः चे व इतरांचे हिलींग, दूरस्थ हिलिंग,ऑरा व चक्र यांची माहिती, त्यांना स्पर्श व त्यांचे परीक्षण करणे तसेच कर्माचा सिद्धांत यांसारख्या बऱ्याच गोष्टी शिकवल्या जाणार आहेत. ही कार्यशाळा वर्ल्ड प्राणिक हिलिंग फाउंडेशनच्या मार्गदर्शक तत्त्वानुसार असून त्यांच्या अधिकृत प्रशिक्षकाद्वारे हे प्रशिक्षण देण्यात येईल. त्याचे इंटरनॅशनल प्रमाणपत्र सहभागी विद्यार्थ्यांना देण्यात येईल. याबद्दल अधिक माहितीसाठी मेघना कदम यांच्या (८३६९७६५९०७/९८६७१८४२०७) यांना संपर्क करावा.

# वाढत्या उन्हाच्या तडाख्यामुळे मैदाने ओस

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

उन्हाच्या वाढत्या तडाख्यामुळे मैदाने ओस पडली आहेत. दुसरीकडे घरात रात्रंदिवस कुलर व पंख्यांची घरघर वाढली असल्याचे चित्र आहे. दिवसेंदिवस सूर्य आग ओकत आहे. त्यामुळे पनवेल तालुक्यातही उन्हाचा पारा वाढताना दिसत आहे. त्याचा परिणाम मैदानी खेळांवर होताना पहावयास मिळत आहे. शालेय खेळाडूंचा वाढत्या उन्हामुळे मैदानाकडील कल अगदीच कमी झाला आहे.

यंदा पाऊस अत्यल्प झाल्याने जलसाठेही तळाला गेले आहेत. पाणीटंचाईचे संकट उभे आहे; तर दुसरीकडे वाढते ऊन व वातावरणातील उष्म्याने जनता त्रासून गेली आहे. गेल्या महिन्यापासूनच उन्हाचा तडाखा सुरू झाला आहे. पाण्याचे दुर्भिक्ष असल्याने तीव्रता अधिक जाणवत आहे. तापमान वाढत असल्याने दुपारी रस्ते निर्मनुष्य दिसत आहेत. लहान मुलांनी दुपारी घराबाहेर जाऊ नये याची काळजी आई-वडील घेत आहेत. वयोवृद्ध वाढत्या उष्म्यामुळे वैतागले आहेत. अनेक ठिकाणी वीजपुरवठा कमी दाबाने होत आहे. त्यामुळे पंखे-कुलर व्यवस्थित सुरू राहत नसल्याच्या तक्रारी वाढल्या आहेत.

वाढत्या उकाड्यामुळे मैदानी खेळ टाळत मोबाईल गेम, टीव्ही, लॅपटॉप अथवा ऑनलाईन गेमिंग, कॅरम अशा बैठ्या खेळाला युवक पसंती देताना दिसत आहेत. शहर व तालुक्यात नववी, दहावी व बारावीच्या परीक्षा झाल्या आहेत; तर पहिली ते आठवीच्या परीक्षा सध्या सुरू आहेत. ऊन लागून आजारी पडण्याची भीती असल्यामुळे सायंकाळी अनेक मुले घराबाहेर पडत मैदानात जाणे पसंत करत आहेत.

**दुपारी मैदानी खेळासाठी मुलांनी मैदानावर जाऊ नये. भरपूर पाणी प्यावे व जवळ पाणी बाळगावे. मैदानामध्ये सकाळी अथवा सायंकाळी खेळ खेळण्यासाठी जाता येईल. उन्हाचा तडाखा वाढत असल्याने शालेय विद्यार्थ्यांनी आरोग्याची काळजी काळजी घ्यावी.**

**-डॉ. बाळसाहेब खडबडे, यशोदा हॉस्पिटल, कामोठे**





पनवेल : हनुमान जन्मोत्सवानिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी उलवे नोड सेक्टर १७ येथील मंदिरात जाऊन भगवान हनुमानाचे दर्शन घेतले. या वेळी मंदिराचे अध्यक्ष तथा भाजप उलवे नोड उपाध्यक्ष अवधेश महतो, ॲड. सुनील मौर्य, मनोज मौर्य, सुनील पांडे, श्रीजना जी, विकास सिंग आदी उपस्थित होते. आयोजकांच्या वतीने लोकनेते रामशेठ ठाकूर यांचे स्वागत करण्यात आले.



पनवेल : तालुक्यातील न्हावा गावच्या यात्रेनिमित्त माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांची न्हावा ग्रामसुधार मंडळाचे अध्यक्ष गजानन म्हात्रे व खजिनदार विनोद पाटील यांनी सदीच्छा भेट घेतली. या वेळी न्हावा सरपंच विजेंद्र पाटील, माजी सरपंच हरिश्चंद्र पाटील, ग्रामपंचायत सदस्य सागरशेठ ठाकूर, भाजप नेते किशोर घरत आदी उपस्थित होते.







पनवेल : हनुमान जन्मोत्सवानिमित्त भाजपचे मावळ लोकसभा निवडणूक प्रमुख आमदार प्रशांत ठाकूर यांनी खारघर मुर्बी, कामोठे शहर व कामोठे गाव येथील हनुमान मंदिरात जाऊन दर्शन घेतले. या वेळी मुर्बी येथे भाजप खारघर अध्यक्ष प्रवीण पाटील, माजी नगरसेवक अभिमन्यू पाटील, नितेश पाटील तर कामोठे येथे भाजप शहर अध्यक्ष रवींद्र जोशी, माजी नगरसेवक विजय चिपळेकर, दिलीप पाटील तसेच राजेश गायकर, संतोष म्हात्रे, किशोर गोवारी, संभाजी चिपळेकर, सुधाकर पाटील, हॅप्पी सिंग, अतुल गोवारी, प्रदीप तांबडे, विपुल पाटील, महेंद्र गोवारी आदी उपस्थित होते.





पनवेल : आमदार महेश बालदी यांचे स्वीय सहाय्यक तथा उरण विधानसभा प्रचार प्रमुख प्रवीण काळबागे यांना वाढदिवसानिमित्त भाजप तालुकाध्यक्ष अरुणशेठ भगत व उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांनी शुभेच्छा दिल्या. या वेळी भाजप नेते प्रल्हाद केणी, अनिल कोकाटे, रहिम लदाप, अशोक आंबेकर आदींसह भाजप कार्यालयातील कर्मचारी वर्ग उपस्थित होता.

## निवडक



### रोह्यात सोलरड्रायर प्रोसेसिंग प्रशिक्षण

**रोहा** : जन शिक्षण संस्थान रायगड व एक्सल इंडस्ट्रीजचे श्री विवेकानंद प्रशिक्षण व संशोधन केंद्राच्या माध्यमातून बुधवारी (दि.२४) रोहा येथे सोलरड्रायर प्रोसेसिंग प्रशिक्षण सुरू करण्यात आले. या वेळी मुख्य अतिथी एचआर विभाग प्रमुख रमेश नंदा, संचालक डॉ. विजय कोकण, सीएसआर प्रमुख सुशील रुळेकर, अकाउंट मॅनेजर प्रतीक्षा चव्हाण, सहाय्यक कार्यक्रम अधिकारी वेदांती पाटील, प्रशिक्षिका मीना सांडगे, सीमा गुदळे, अनिता घोसाळकर, प्रशिक्षणार्थी उपस्थित होते.

### माथेरान प्राथमिक शाळेला साहित्य



**माथेरान** : माथेरानमध्ये प्राथमिक शाळेला कै. जश मिलन गांधी यांच्या स्मरणार्थ तिचे वडील मिलन गांधी यांनी स्मार्ट टीव्ही व शालेय वस्तू, खाऊचे वाटप केले. कै. जश गांधी याचे २०२०मध्ये अल्पशा आजाराने निधन झाले होते. त्याच्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून मिलन गांधी हे दरवर्षी वेगवेगळ्या ठिकाणी गरजूंना मदत करीत असतात. येथील विद्यार्थ्यांना पाहून या शाळेसाठी आपणास जे काही करता येईल ते करण्यास आपण तयार आहोत, असे त्यांनी आपले मनोगत व्यक्त करताना या वेळी सांगितले.

### महुरे गावात हनुमान जयंती उत्साहात

**धाटाव** : तळा तालुक्यातील महुरे गावात मंगळवारी (दि. २३) हनुमान जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. यानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रम व महाप्रसाद वाटपाचे



कार्यक्रम घेण्यात आले. गावात टाळ मृदुंगाच्या तालावर लहानांपासून ते ज्येष्ठ नागरिक, महिलांनी ठेका धरला होता. घरोघरी आलेल्या पालखीचे परंपरेनुसार जंगी स्वागत केले. हनुमान मंदिरांची विद्युत रोषणाई केली होती.

### चौल येथे एकपात्री अभिनय स्पर्धा

**रेवदंडा** : चौल भाटगल्ली येथील प्रकाश कवळे यांचे निवासस्थानी एकपात्री अभिनय स्पर्धा १ मे रोजी सायंकाळी ४ वा. घेण्यात येणार आहे. ज्येष्ठ अभिनेत्री आशाता वाबगावकर यांच्या स्मरणार्थ मोरया कला ॲकदमी चौल यांचे वतीने या स्पर्धेचे आयोजन करण्यात येणार आहे. या स्पर्धेत गट १ हा पाच ते १४ वर्षे वयोगटाचा असेल व वेळ तीन ते पाच मिनिटे देण्यात येईल, तसेच गट क्रमांक २ हा १५ वर्षांपुढील वयोगटात असून वेळ चार ते सात मिनिटे देण्यात येईल. दोन्ही गटात प्रथम क्रमांकास दोन हजार रु., द्वितीय क्रमांकास १५०० रु., तृतीय क्रमांकास एक हजार रु. अशी बक्षिसे ठेवण्यात आली आहेत. स्पर्धेसाठी प्रवेश फी रूपये १५० रूपये ठेवण्यात आली असून सहभागी होण्यासाठी २८ एप्रिलपर्यंत संपर्क साधावा, तसेच पहिल्या गटासाठी फक्त वीस प्रवेशिका स्विकारण्यात येणार आहेत. स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रकाश कवळे (९९६९००९७२१), निलेश खोत (८४४६५३५३१८), सुधाकर मेस्त्री (९७०२५४५०१२) यांचेशी संपर्क साधावा असे आवाहन करण्यात आले आहे.

# राज्य उत्पादन शुल्कच्या कारवाईत २५७ गुन्हे नोंद

## २५६ आरोपींना अटक; ७१ लाख ८६ हजारांचा मुद्देमाल जप्त

**रायगड : रामप्रहर वृत्त**

लोकसभा निवडणूक सन २०२४च्या अनुषंगाने राज्य उत्पादन शुल्क विभागाच्या वतीने केलेल्या कारवाईत रायगड जिल्ह्यात आदर्श आचारसंहिता लागू झाल्यापासून १६ मार्च ते २२ एप्रिलपर्यंत एकूण २५७ गुन्हे नोंदविण्यात आले असून २५६ आरोपींना अटक करण्यात आली आहे, असे अधीक्षक राज्य उत्पादन शुल्क विभाग आर. आर. कोले यांनी सांगितले.

संपूर्ण कारवाईमध्ये एक लाख १२ हजार ८७२ लिटर दारू व १३ वाहने जप्त करण्यात आली असून एकूण जप्त मुद्देमालाची किंमत रुपये ७१ लाख ८६ हजार ८४१ आहे.

रायगड लोकसभा मतदारसंघात एकूण १४५ गुन्हे नोंद करण्यात येवून ४५ लाख ३९ हजार ४१५ रुपये किंमतीचा मुद्देमाल व मावळ मतदारसंघात एकूण ११२ गुन्हे नोंद करण्यात आले असून रुपये २६ लाख ४७ हजार ४२६ किमतीचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे, तसेच फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३च्या कलम १४९ खाली एकूण ५९६ संशयित व सराईत गुन्हेगारांना नोटीस बजाविण्यात आली आहे.

अवैध मद्याच्या व्यवसायात गुंतलेल्या सराईत व्यक्तीविरूद्ध महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९मधील कलम ९३अंतर्गत एकूण २२१ प्रस्ताव लोकसभा मतदारसंघातील उपविभागीय दंडाधिकारी यांच्याकडे दाखल करण्यात आले असूनपैकी १२३ कलम ९३ अंतर्गत बंधपत्र करून घेण्यात आले आहे. लोकसभा निवडणूक आदर्श आचारसंहितेचे उल्लघंन केल्यामुळे रायगड जिल्ह्यात एकूण १० मद्यविक्री अनुज्ञप्त्या पुढील आदेश होईपर्यंत निलंबित करण्यात आल्या आहेत.

आचारसंहिता कालावधीत या विभागाची सात पथके तैनात असून पथकांस आंतरराजीय मद्य तस्करी होणार नाही, तसेच बेकायदेशीर हातभट्टी दारूनिर्मिती व विक्री केंद्र यांच्यावर कारवाई करण्यात येत आहे, तसेच कोणत्याही प्रकारची अवैध मद्य वाहतूक होणार याकरीता खालापूर, पेण व पोलादपूर येथे तीन तपासणी नाके उभारण्यात आले असून तेथे संशयित वाहनांची सखोल तपासणी करण्यात येत आहे.

निवडणूक कालावधीत गोवा राज्यातून गोवानिर्मित मद्याची चोरटी वाहतूक रेल्वे प्रशासनाच्या रो-रो सेवेद्वारे वाहतूक होण्याची शक्यता असल्याने कोलाड येथे रो-रो रेल्वे सेवेद्वारे येणाऱ्या वाहनांची पोलीस विभाग व रेल्वे प्रशासन यांच्याशी समन्वय साधून तपासणी करण्यात येत आहे.

रायगड जिल्ह्यात लोकसभा निवडणूक २०२४ आचारसंहिता कालावधीत सर्व मद्य उत्पादक घटक, ठोक विक्री व किरकोळ विक्री अनुज्ञप्तीवर प्रभावी नियत्रंण ठेवण्याकरीता अनुज्ञप्त्यांच्या ठिकाणी सीसीटीव्ही कॅमेरे बसविण्यात आलेले आहेत, तसेच हे कंट्रोल रुम जिल्हाधिकारी कार्यालयात कार्यान्वित करण्यात आले आहेत.

रायगड मतदारसंघात मतदारांना दारुचे प्रलोभन देत असल्याचे निदर्शनास आल्यास तसेच अवैध मद्यनिर्मिती व विक्रीबाबत काही तक्रारी असल्यास या विभागाचा व्हॉट्सॲप (८४२२००११३३) व टोल फ्री (१८००२३३९९९९) व अधीक्षक कार्यालय रायगड येथील दूरध्वनी (०२१४१-२२८००१) वर संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

## चरस विक्रीसाठी आलेले दोघे पोलिसांच्या ताब्यात

**पेण : प्रतिनिधी**

अलिबाग येथे चरस विक्रीक करण्यासाठी जाणाऱ्या दोन आरोपींना जणांना गुन्हे अन्वेषण विभागाच्या पथकाने पेण पोलीस ठाण्याच्या हद्दीत एक किलो २० ग्रॅम चरससह अटक केली. यामध्ये एका महिलेचा समावेश असून मुख्य आरोपीचा पोलीस शोध घेत आहेत. आरोपींना पेण कोर्टात हजर केले असता शुक्रवार (दि.२६)पर्यंत पोलीस कस्टडी सुनावण्यात आली आहे.

अलिबाग येथे चरस विकण्यासाठी काही व्यक्ती येणार असल्याची माहिती स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेला मिळाली होती. त्यानुसार सोमवारी पोलिसांनी



पेण परिसरात सापळा रचला मोटारसायकलवरून आलेल्या श्रवणकुमार कनकरत्नम (वय २७, रा. इंडिया बुल्स रेसिडेन्सी पनवेल) व खुशबू दिलीप शहा (वय ३०, रा. बदलापूर) यांची झडती घेतली असता त्यांच्याकडे पाच लाख २० हजार रुपयांचे एक किलो २० ग्रॅम चरस सापडले.

या प्रकरणी आरोपींविरोधात पेण पोलीस ठाणे येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील अधिक तपास स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखा करीत आहे.

## मतदान यंत्रांची द्वितीय सरमिसळ प्रक्रिया पूर्ण

**रायगड** : लोकसभा मतदारसंघासाठी मतदान ७ मे रोजी होणार असून यासाठी मतदान यंत्रांची द्वितीय सरमिसळ प्रक्रिया जिल्हा निवडणूक अधिकारी किशन जावळे, निवडणूक निरीक्षक सर्वसाधारण संजीव कुमार झा, निवडणूक खर्च निरीक्षक धीरेंद्रमणी त्रिपाठी यांच्या प्रमुख उपस्थितीत जिल्हाधिकारी कार्यालयाच्या राजस्व सभागृहात झाली.

मतदान प्रक्रियेसाठी मतदार संघात एकूण तीन हजार ४७ बॅलेट युनिट, तीन हजार ४७ कंट्रोल युनिट व तीन हजार २०६ व्हीव्हीपॅट प्राप्त झाले आहेत. त्याची सरमिसळ प्रक्रिया झाली आहे.

## किल्ले रायगडावर छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुण्यतिथी दिनी कार्यक्रम

**महाड : रामप्रहर वृत्त**

श्री शिवाजी रायगड स्मारक मंडळ पुणे, स्थानिक उत्सव समिती यांच्या संयुक्त विद्यमाने छत्रपती शिवाजी महाराजांच्या ३४४व्या पुण्यतिथी दिनी कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या कार्यक्रमाला आमदार भरत गोगावले, हभप पुरुषोत्तम महाराज मोरे देहूकर, मंडळाचे अध्यक्ष रघुजीराजे आंग्रे, सरसेनापती प्रतापराव गुजर व हंबीरराव मोहिते यांच्या घराण्याचे वंशज तसेच एअर व्हाईस मार्शल सूर्यकांत चाफेकर, मंडळाचे कार्यवाह सुधीर थोरात, स्थानिक उत्सव समितीचे अध्यक्ष त्रिंबक पुरोहित, कार्यवाह संतोष कदम उपस्थित होते. आमदार भरत गोगावले यांनी



रायगडावरील राजदरबारात १० वर्षांपूर्वी सुरू असलेली पोलीस दलाची मानवंदना पुन्हा सुरू करण्याबाबत आपण मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून प्रयत्न करणार असल्याची ग्वाही दिली.

रायगड स्मारक मंडळाचे अध्यक्ष रघुजीराजे आंग्रे यांनी, हिंदू जनमानसाला जोडणारा दुवा म्हणून छत्रपती शिवाजी महाराज संपूर्ण देशात ओळखले जात असल्याचे सांगितले. या वेळी शिवाजी रायगड स्मारक मंडळातर्फे प्रतिवर्षी देण्यात येणारा श्री शिवपुण्य स्मृती रायगड पुरस्कार ज्येष्ठ मूर्तिशास्त्राचे अभ्यासक डॉ. गो. बं. देगलूरकर यांना जाहीर करण्यात आला.

## रोह्यात सुनील तटकरे यांना मताधिक्य देण्याचा निर्धार

**रोहे : प्रतिनिधी**

लोकसभा निवडणुकीच्या प्रचाराची रणधुमाळी रायगड जिल्ह्यात जोरदार सुरू आहे. प्रचार दौऱ्यात महायुतीच्या कार्यकर्त्यांनी खासदार सुनील तटकरे यांना पुन्हा एकदा भरघोस मताधिक्याने निवडून देणार असल्याचा निर्धार केला आहे.

या वेळी माजी नगराध्यक्ष संतोष पोटफोडे, राष्ट्रवादी शहराध्यक्ष प्राजाक्ता चव्हाण आदींसह माजी नगरसेवक, राष्ट्रवादी, शिवसेना, भाजप व आरपीआयचे कार्यकर्ते प्रचारात सहभागी झाले होते. शहरात राष्ट्रवादी, शिवसेना, भाजप व आरपीआयच्या कार्यकर्त्यांनी प्रचार पत्रके वाटली व आपल्या उमेदवाराचा प्रचार केला. मतदारांचा चांगला पाठिंबा महायुतीचे उमेदवार



सुनील तटकरे यांना असल्याचे या वेळी या कार्यकर्त्यांनी सांगितले. त्यामुळे खासदार म्हणून सुनील तटकरे यांना सर्वाधिक मताधिक्याने निवडून देणार असल्याचे कार्यकर्त्यांनी सांगितले. या प्रचारफेरीला महिलांची उपस्थिती लक्षणीय होती.

**सुनील तटकरे साहेब यांचा रोहा शहरात जास्तीत जास्त जनसंपर्क असल्याने त्यांच्या प्रचारार्थ महायुतीचे कार्यकर्ते फिरत असताना मतदारांचा चांगला प्रतिसाद मिळत आहे. खासदार सुनील तटकरे, ना. आदिती तटकरे व आमदार अनिकेत तटकरे यांच्या माध्यमातून शहरात विकासकामे झाली आहेत. याचा फायदा होणार आहे.**
**-महेंद्र गुजर, माजी गटनेते**

## तक्रार निवारण, जप्तीची रक्कम परत करण्यासाठी समित्या गठीत

**रायगड :** लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने रायगड लोकसभा मतदारसंघांतर्गत उमेदवारांच्या खर्चविषयक तक्रारीचे निवारण करण्यासाठी खर्च नियंत्रण समित्ती गठीत करण्यात आली असून या खर्च नियंत्रण समितीमध्ये खर्च निरीक्षक अध्यक्ष धिरेंद्र मनी त्रिपाठी, जिल्हा निवडणूक अधिकारी तथा जिल्हाधिकारी किशन जावळे (भा.प्र.से.), खर्च संनियंत्रण समितीचे नोडल अधिकारी म्हणून राहुल केशय कदम कामकाज पाहणार आहेत.

पहिली तपासणी २५ एप्रिल सकाळी १० ते सायंकाळी ५, दुसरी तपासणी ३० एप्रिल सकाळी १० ते सायंकाळी ५, तिसरी तपासणी ४ मे सकाळी १० ते सायंकाळी ५ होणार आहे. सर्व उमेदवारांनी आपल्या प्रचार मोहिमेच्या कालावधीतील सर्व लेखे/ खर्चाच्या नोंदवह्या अद्ययावत करून नमूद केलेल्या तारखांना राजस्व सभागृह, जिल्हाधिकारी कार्यालय, अलिबाग येथे तपासणीसाठी सादर करावेत, असे सांगण्यात आले आहे.

## वाशीच्या भवानी जगदंबा देवीची यात्रा उत्साहात

### मंत्री आदिती तटकरे यांनी घेतले दर्शन

**पेण : प्रतिनिधी**

पेणच्या खारेपाटातील लाखो भाविकांचे श्रद्धास्थान असलेल्या वाशी गावाची भवानी जगदंबा देवीची यात्रा व पालखी सोहळा उत्साहात साजरा झाला. या यात्रेचे वैशिष्ट्य म्हणजे देव काठ्यांची स्पर्धा, गळाला नवस फेडणे ठिकठिकाणाहून येणारे लेपा (पातखी) सोबत शेकडो भक्तगण नाचत-गाजत देवीच्या दर्शनासाठी येतात.

या वेळी महिला व बालकल्याण मंत्री आदिती तटकरे यांनी यात्रेच्या पूर्वसंध्येला भेट देऊन माऊलीचे दर्शन घेतले. भक्तगण देवीच्या दर्शनासाठी दोन दिवस वाशी गावात हजेरी लावतात. वाशी गावात यात्रेनिमित्त एसटी महामंडळाच्या गाड्या भाविकांसाठी उपलब्ध करण्यात आल्या. मंदिरापासून एक किमी अंतरावर दुकानांची रस्त्याच्या दुतर्फा रांगा तसेच खासगी वाहनांसाठी पार्किंग व्यवस्था करण्यात आली होती.

देवीची प्रतिष्ठापना सुमारे ८०० वर्षांपूर्वी करण्यात आली. मोडी लिपीत आठ पॉईंट चार आकाराच्या ताम्रपटावर लिहिलेल्या पुराव्यावरून हिंदवी स्वराज्य संस्थापक छत्रपती शिवाजी महाराज या ठिकाणी आले होते. तेव्हा त्यांनी जगदंबा मातेचे दर्शन घेतले होते, असे ताम्रपटावरुन स्पष्ट होते. या देवीचे प्राचीन नाव वसुंधरादेवी पण बोली आगरी भाषेत वाशीची वरसूबाय देवी असे नामकरण झाले आहे. सरखेल कान्होजी आंग्रे यांनी छत्रपती शिवाजी महाराजांच्या आरमारात निर्मिती वेळी समुद्र किनारपट्टीच्या पाहणीच्या वेळी जगदंबा देवीचे दर्शन घेतले होते. मंदिरातील देवीची मूर्ती अतिशय सुबक आहे. समोर प्रशस्त तलाव आहे. बाजूला लगत शिवमंदिर तर पूर्वेकडे साईबाबांचे मंदिर आहे. देवीच्या उजव्या बाजूला मंदिरात पाच फुटी मारुतीची मूर्ती आहे. या मूर्तीची समर्थ रामदास स्वामींनी प्रतिष्ठापना केली आहे. उजव्या बाजूला श्रीराम मंदिर आहे. जगदंबा मंदिराचे प्रशस्त बांधकाम नव्याने करण्यात आले आहे.

विविध प्रकारची दुकाने व मनोरंजन करणारे आकाश पाळणे, चक्राकार पाळणे, गावोगावच्या देवी देवतांच्या उंच देव काठ्या, उंच तोलाई काट्यावर टांगून नवस फेडण्यासाठी येणारे भाविक भक्त, अंगात देवीच वारे घेऊन येणारे लेपा, गुलालाची उधळण, वाजंत्री याचा मनमुराद आनंद भाविकांनी घेतला.






## मुरूड येथील रक्तदान शिबिराला उत्स्फूर्त प्रतिसाद

**मुरूड : प्रतिनिधी**

रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे असे आपण मानतो. रक्तदानामुळे अनेकांना जीवनदान मिळते तसेच आपण समाजाचे देणे लागतो ही भावना रक्तदात्यामध्ये अधिक दृढ होऊन आत्मिक समाधान लाभते, असे प्रतिपादन माजी वैद्यकिय अधिकारी डॉ. मंगेश पाटील यांनी आयोजित रक्तदान शिबिराच्या उद्घाटनावेळी केले.

महादेव कोळी समाज कोळीवाडा, डॉ. मंगेश पाटील यांचे श्रीयश हॉस्पिटल आणि शासकीय रक्तपेढी जिल्हा रुग्णालय अलिबाग यांच्या संयुक्त विद्यमाने भव्य रक्तदान शिबिरात रक्तदात्या समाजबांधवांना संबोधित करताना ते बोलत होते. या रक्तदान शिबिरात उल्लेखनीय बाब अशी की, मुरूड-राजपुरी कोळीवाड्यातील तरुण व महिलांचा स्वयंस्फूर्तीने सहभाग होता. एकूण १३१ रक्तदात्यांनी रक्तदान करून सामाजिक बांधिलकी जोपासून राष्ट्रीय कार्यात योगदान दिले.

या वेळी डॉ. मकबुल कोकाटे, डॉ. मंगेश पाटील, डॉ. संजय पाटील, डॉ. अनंत जोशी, डॉ. एस. बी. कीर, डॉ. जैन, डॉ. श्रीया पाटील, नाट्य कलावंत अभय पैर, डॉ. दीपक गोसावी, कोळी समाज अध्यक्ष मनोहर मकू, प्रभाकर वरसोलकर, मनोहर बैले, डॉ



इप्सित पाटील आदी उपस्थित होते. या रक्तदान शिबिरात रक्तदात्यांना प्रशस्तीपत्र व भेटवस्तूही देण्यात आली.

रक्तदान शिबिर यशस्वीतेसाठी शासकीय रक्तपेढी जिल्हा रुग्णालय अलिबाग यांचे विशेष सहकार्य लाभले, तसेच सुनील सोनार, प्रशांत तुरुरे, वैभव कांबळे, मंगेश पिंगळा, महेश घाडगे, सुशांत भगत, अभिषेक घरत, नरेंद्र घागरी, नरेश गिदी, जितेंद्र मकु, प्रल्हाद गोंजी, ऋत्विक मकु, सुरेंद्र मकु, ऋषिकेश बैले आदींनी विशेष परिश्रम घेतले.

# लखनौकडून चेन्नईचा बालेकिल्ल्यात पराभव



**चेन्नई : वृत्तसंस्था**

पाच वेळा चॅम्पियन चेन्नई सुपर किंग्सचा लखनौ सुपर जायंट्सविरुद्ध अखेरच्या षटकात पराभव झाला. सर्वांत महत्त्वाची गोष्ट म्हणजे चेन्नईला त्यांच्याच बालेकिल्ल्यात लखनौकडून पराभव पत्करावा लागला आहे.

आयपीएलच्या या हंगामात सीएसकेला घरच्या मैदानावर पराभूत होण्याची ही पहिलीच वेळ आहे. या पराभवानंतर चेन्नई सुपर किंग्ज पॉइंट टेबलच्या टॉप ४मधून बाहेर पडला आहे. या हंगामात सीएसके प्रथमच पहिल्या ४मधून बाहेर आहे. त्याचवेळी लखनौ सुपर जायंट्सने टॉप ४मध्ये एंट्री केली आहे.

लखनौ सुपर जायंट्सने आठपैकी पाच सामने जिंकले असून १० गुणांसह ते गुणतालिकेत चौथ्या स्थानावर पोहचले आहेत. सीएसके आठ सामन्यांमधला हा चौथा पराभव आहे. चेन्नई सुपर किंग्जचे चार विजयांसह आठ गुण असून ते पाचव्या स्थानावर घसरले.

राजस्थान रॉयल्स प्लेऑफच्या जवळपास पोहचली आहे. संजू सॅमसनच्या नेतृत्वाखालील राजस्थान संघाने आठपैकी सात सामने जिंकून १४ गुणांसह आपले अव्वल स्थान मजबूत केले आहे, तर कोलकाता नाईट रायडर्स सातपैकी पाच विजयांसह १० गुणांसह दुसऱ्या स्थानावर आहे. सनरायझर्स हैदराबादचेही १० गुण आहेत, पण नेट रनरेटच्या आधारावर ते तिसऱ्या स्थानावर आहेत.

शुभमन गिलच्या नेतृत्वाखालील गुजरात टायटन्सचे आठ गुण आहेत आणि ते चेन्नईनंतर सहाव्या स्थानावर आहे, तर मुंबई आठपैकी तीन विजयांसह सहा गुणांसह सातव्या स्थानावर आहे. दिल्ली कॅपिटल्स आठपैकी तीन विजयांसह आठव्या स्थानावर आहे, तर पंजाब किंग्ज आठपैकी दोन विजयांसह नवव्या स्थानावर आहे. रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूने आठपैकी सात सामने गमावले आहेत.

# जोकोविच, बोनमतीला लॉरेओ पुरस्कार

**पॅरिस : वृत्तसंस्था**

क्रीडा क्षेत्रातील प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या लॉरेओ पुरस्कारासाठी यंदा सर्बियाचा तारांकित टेनिसपटू नोव्हाक जोकोविच आणि स्पेनची महिला फुटबॉलपटू ऐताना बोनमती यांची निवड करण्यात आली. जोकोविचने गेल्या वर्षी एटीपी फायनल्ससह तीन ग्रँडस्लॅम विजेतेपदे मिळवली होती.




कारकीर्दीत विक्रमी २४ ग्रँडस्लॅम विजेतीपदे मिळवणारा जोकोविच पाचव्यांदा या पुरस्काराचा मानकरी ठरला. जोकोविचने येथेही स्वित्झर्लंडचा २० ग्रँडस्लॅम विजेता माजी टेनिसपटू रॉजर फेडररशी बरोबरी केली. माद्रिद येथे झालेल्या एका विशेष सोहळ्यात या पुरस्कारांचे वितरण करण्यात आले.

मी सर्वप्रथम २०१२मध्ये हा पुरस्कार मिळवला होता. आता १२ वर्षांनंतर पुन्हा हा पुरस्कार मिळाल्याचा मला अभिमान वाटतो, असे जोकोविच म्हणाला.

महिला विभागात या पुरस्काराची मानकरी ठरलेली बोनमती हा सन्मान मिळवणारी पहिली फुटबॉलपटू ठरली आहे. या वेळी महिला विश्वचषक विजेत्या स्पेन संघाचाही सन्मान करण्यात आला. प्रथमच ही स्पर्धा जिंकल्याबद्दल त्यांना २०२३ वर्षातील सर्वोत्तम संघ म्हणून निवडण्यात आले. हे पुरस्कार २०००पासून दरवर्षी दिले जातात. क्रीडा क्षेत्रातील ६९ तज्ज्ञ या पुरस्कार्थींची निवड करतात.



## अभिनंदन!

**पनवेल : घणसोली येथे टॅलेंट रेकॉर्ड बुक यांनी २६ जानेवारीला आयोजित केलेल्या स्पर्धेमध्ये रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्समधील खेळाडू निधीश चौधरी याने रोलर स्केटिंगमध्ये सुवर्णपदक मिळविले. त्याची नोंद राष्ट्रीय विक्रमामध्ये झाली आहे. याबद्दल रामशेठ ठाकूर इंटरनॅशनल स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सचे संस्थापक माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी त्याचे कौतुक केले व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.**

# राष्ट्रीय युनिफाईट अजिंक्यपद स्पर्धेत महाराष्ट्र संघ प्रथम

**पनवेल : रामप्रहर वृत्त**

दिल्ली येथे २२ व २३ एप्रिलदरम्यान राष्ट्रीय युनिफाईट अजिंक्यपद स्पर्धा पार पडली. या स्पर्धेत ५२ सुवर्णपदक, ३३ रौप्यपदक आणि पाच कांस्यपदकांसह महाराष्ट्र युनिफाईट संघाने प्रथम अजिंक्यपद मिळवले.

महाराष्ट्र संघाचे प्रशिक्षक म्हणून सुनील वडके, रवींद्र म्हात्रे, सागर कोळी, विनोद कुंजीर, प्रतिक कारंडे यांचे मार्गदर्शन लाभले.



युनिफाईट वेलफेअर असोसिएशन महाराष्ट्रचे अध्यक्ष संतोष खंदारे, महासचिव डॉ. मंदार पनवेलकर तसेच राष्ट्रीय युनिफाईट संघटनेचे अध्यक्ष विशाल सिंग यांनी संघाचे अभिनंदन केले आणि पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# आशियाई ज्युनिअर ॲथलेटिक्ससाठी महाराष्ट्राच्या सात खेळाडूंची निवड

**नागपूर : प्रतिनिधी**

दुबई येथे सुरू झालेल्या आशियाई ज्युनिअर ॲथलेटिक्स स्पर्धेसाठी ६० खेळाडूंचा भारतीय संघ जाहीर करण्यात आला असून त्यात महाराष्ट्राच्या सात ॲथलिट्सचा समावेश आहे. भारतीय संघात ३१ मुलांचा समावेश आहे. ही स्पर्धा २७ ते ३१ ऑगस्ट या कालावधीत लिमा (पेरू) येथे होणाऱ्या जागतिक ज्युनिअर स्पर्धेसाठी पात्रता स्पर्धाही आहे.

भारतीय संघात महाराष्ट्राच्या गौरव भोसले (पुणे), निखिल ढाके, अनुष्का कुंभार (सातारा), प्राची देवकर (सातारा), रुजुला भोसले, साक्षी चव्हाण, सिया सावंत (मुंबई) यांचा समावेश आहे. गौरव हा माजी आंतरराष्ट्रीय धावपटू भास्कर भोसले यांचा मुलगा असून त्याची ही पहिलीच आंतरराष्ट्रीय स्पर्धा होय. तो ३००० व ५००० मीटर शर्यतीत सहभागी होईल.





**पनवेल : महायुतीचे मावळ लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार खासदार श्रीरंग बारणे यांच्या विजयासाठी जोरदार प्रचार करण्यात येत आहे. महायुतीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी भोकरपाडा, मोहो, विचुंबे, देवद, वांगणीतर्फे वाजे, लोणीवली येथे पत्रक वाटून घरोघरी जाऊन प्रचार केला.**








जीवेत् शरदः शतम्!

**रजनी सुनील पाटील**


यांना वाढदिवसाच्या

हार्दिक शुभेच्छा



शुभेच्छुक
ज्योती सिंगासने





ज्ञानराज माझी योग्यांची माऊली।। जेणे निगमवल्ली प्रगट केली।।




विठ्ठल रुख्मीणी तुम्ही अखंड आणा ध्यानी।।

वर्ष १९ वे

वाचावी ज्ञानेश्वरी । डोळा पहावी पंढरी ।।१।।
ज्ञान होय अज्ञानासी । ऐसा वर त्या टीकेसी ।।२।।
ज्ञान होय मूढा । अति मूर्ख त्या दगडा ।।३।।
वाचील जो कोणी । जनी त्यासी लोटांगणी ।।४।।



सर्व मंगल मांगल्ये। शिवेसर्वार्थ साधिके शरण्ये त्र्यंबकेगौरी। नारायणी नमोस्तुते।।



तुकाराम तुकाराम नाम घेता कापे यम।।

## माऊली हरिपाठ मंडळ, गव्हाण-कोपर आयोजित

**वै ह.भ.प. अप्पा माऊली (पनवेल) यांच्या कृपाशिर्वादाने**
**ह.भ.प. बानुबाई (कोपर) यांच्या उपस्थितीत**

# अखंड हरिनाम सप्ताह

## ग्रंथराज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा

**ठिकाण - श्री शांतादेवी मंदीर, गव्हाण, ता. पनवेल, जि. रायगड**

**देवीचा अभिषेक सकाळी ८.०० वा.**

**व्यासपीठ चालक - ह.भ.प. शिवाजी महाराज पाटणकर (आळंदी-देवाची)**

**दैनंदिन कार्यक्रम**

पहाटे ४.०० ते ६.०० वा. -काकडा
सकाळी ८.३० ते १२.०० वा. -ज्ञानेश्वरी पारायण
सायं. ४.०० ते ५.०० वा. -प्रवचन
सायं. ६.०० ते ७.०० वा. -सामुदायिक हरिपाठ
रात्री ७.३० ते ९.३० वा. -किर्तन
किर्तनसाथ : पनवेल-उरण वारकरी सांप्रदाय

| वार/दिनांक | प्रवचन (सायं. ४ ते ५) | किर्तन (रात्री ७.३० ते ९.३०) |
|---|---|---|
| गुरुवार (दि. २५/०४/२०२४) | ह.भ.प. कृष्णा महाराज ठाकूर (धुतुम) | सदगुरु कृपांकित ह.भ.प. श्री. जयेश महाराज भाग्यवंत (श्रीमलंगगड) सौजन्य : श्री. सुधीर तुलशिदास ठाकूर (खारकोपर) |
| शुक्रवार (दि. २६/०४/२०२४) | ह.भ.प. धावजी बाबा महाराज (जासई) | ह.भ.प. दिपक महाराज देशमुख (विश्वस्त श्री आगस्ती देवस्थान ट्रस्ट, अकोले) कै. शिवाजी रघुनाथ देशमुख यांच्या स्मरणार्थ सौजन्य: श्री. किरण शिवाजी देशमुख (गव्हाण) |
| शनिवार (दि. २७/०४/२०२४) | स. ८.३० वा. -ग्रंथराज ज्ञानेश्वरी पुजन सायं. ४ ते ५वा. - दिंडी सोहळा व दिपोत्सव सोहळा | ह.भ.प. युवराज काका महाराज देशमुख (आळंदी देवाची) कै. गिताबाई त्रिबंक देशमुख यांच्या स्मरणार्थ सौजन्य: श्री विराज जयवंत देशमुख (गव्हाण) |

**काल्याचे किर्तन रविवारी दि. २८ एप्रिल २०२४ रोजी सकाळी १० ते १२ वा.**
**भागवताचार्य ह.भ.प. प्रविणजी महाराज पवार (संभाजीनगर)**
**कै. महेश रघुनाथ घरत यांच्या स्मरणार्थ सौजन्य : श्री. सचिनशेठ रघुनाथ घरत (शेलघर)**


दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या जाहिरातीतील सेवा, उत्पादने अथवा त्यासंदर्भातील कोणत्याही दाव्यांची वा उपयोगाची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहर घेणार नाही. दैनिक राम प्रहर या वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची खातरजमा व शहानिशा वाचकांनीच करून संबंधितांशी व्यवहार करावेत. त्यासंदर्भात प्रसिद्ध झालेल्या दाव्यांच्या पूर्ततेची, तसेच कोणत्याही मजकुराची कोणतीही हमी वा जबाबदारी मल्हार नेटवर्क प्रा. लि. अंतर्गत दैनिक राम प्रहरचे मुद्रक, प्रकाशक, संपादक वा मुख्य संपादक यांच्यावर राहणार नाही, याची दैनिक राम प्रहरच्या वाचकांनी आणि जाहिरातदारांनी नोंद घ्यावी. **–मुख्य संपादक**

हे पत्र मालक मल्हार नेटवर्क प्रा. लि. करिता मुद्रक, प्रकाशक कृष्णा चांगू ठाकूर यांनी सिद्धकला प्रिंट मीडिया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा. लि., डब्ल्यू २३० टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, ठाणे-बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई ४०० ७१० येथे छापून अस्पायर प्राईड, गाळा नं. ४, रुपाली चौक, पनवेल. ४१० २०६. रायगड येथून प्रकाशित केले. RNI Regn. No. MAH MAR/2008/26534, **मुख्य संपादक : देवदास मताले**. पोस्टल परवाना क्र. एनएमबी/१२०/२०२०-२२. कार्यालय संपर्क : दूरध्वनी ०२२-२७४८०१००, २७४९०१०० e-mail : ramprahar@gmail.com